# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ६, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, दिव्यांग कल्याण, अपारंपारिक ऊर्जा मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४४**

---

### मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीचे कामादरम्यान वायू प्रदूषण नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(१) * ६९३३ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीच्या ३० एकर जागेवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या कामादरम्यान वायु प्रदूषण नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन होत असल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने काम थांबविण्याची नोटीस बजाविली असतानाही सदर काम सुरु असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या कामादरम्यान वायु प्रदूषण नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच वांद्रे (पूर्व) येथील वायू प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार वांद्रे (पूर्व) येथील मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या निष्कासनाची कारवाईदरम्यान वायु प्रदूषण नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन निदर्शनास आल्यानंतर एच/पूर्व विभागातर्फे निरिक्षण अहवाल दिनांक १९/१२/२०२५ रोजी बजावण्यात आला. तद्नंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २०/१२/२०२५ रोजी (Show cause Notice) कारणे दाखवा नोटिस बजावून दिनांक २९/१२/२०२५ रोजी Stop Work Notice देण्यात आली आहे. दिनांक २९/१२/२०२५ पासून सदर साईट बृहन्मुंबईपालिकेच्या निरिक्षणाखाली असून सद्य:स्थितीत तेथे कोणतेही निष्कासनाचे काम चालू नाही. तसेच यापूर्वी दिनांक ०६/०१/२०२६ रोजी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग यांना पुनश्च: सूचना देण्यात आल्या होत्या.

तसेच, दिनांक २०/०१/२०२६ रोजी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग क्र.१ बांद्रा (पू.), मुंबई यांना सदर बाबतीत वायु प्रदूषणविषयक मार्गदर्शक तत्वांचे काटेकोर पालन करण्यात यावे, अन्यथा काम सुरू करू नये असे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मार्ग बदलल्याबाबत

**(२)** * **६५८४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे - नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मूळ मार्ग बदलून तो शिर्डीमार्गे नेण्याच्या निर्णयाविरोधात संगमनेर व अकोले तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलने करून नागरिकांनी शासनाकडे निवेदने दिली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे - नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या जुन्या मार्गासाठी संगमनेर तालुक्यातील २१९ हेक्टर जमीन संपादित करून सुमारे २१ कोटी रुपयांचा मोबदला यापूर्वीच वाटप करण्यात आला असताना, मार्ग बदलल्यामुळे उक्त शासकीय निधीचा अपव्यय होत असल्याचा आक्षेप नागरिकांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने आंदोलकांकडून प्राप्त झालेल्या निवेदनातील मागण्यांवर तसेच संपूर्ण तांत्रिक व आर्थिक बदलांच्या कारणांच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) व (३) या प्रकल्पाकरीता संगमनेर तालुक्यातील खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने एकूण संपादीत करावयाचे क्षेत्र २२८.२०५ हे. आर पैकी मा.जिल्हास्तरीय समितीने १३२.०३ हे. आर क्षेत्राचा मोबदला निश्चित करुन दिलेला आहे. त्यापैकी १९.३५ हे.आर जमीन महारेल कंपनीने खरेदी केलेली असून त्यापोटी रुपये २९.८९ कोटी इतका मोबदला संबंधित खातेदार यांना अदा केलेला आहे. महारेलने प्रस्तावित केलेल्या आरेखनामुळे जायन्ट मिटरवेव्ह रेडियो टेलिस्कोप (GMRT) ऑब्झर्व्हेटरीच्या अँटेनास व्यत्यय येत असल्यामुळे रेल्वेबोर्डाने सदर प्रकल्प महारेलकडून राबविण्यास दिनांक ०२/०६/२०२० रोजी दिलेली प्राथमिक तत्वतः मान्यता काढून घेण्यात येत असल्याबाबत व सदर प्रकल्पावर अधिक खर्च न

करण्याची काळजी घेण्याबाबत दिनांक २१/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये महारेलला कळविले आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकल्प मध्य रेल्वेकडून राबविण्यात येत आहे.

मध्य रेल्वेने, संगमनेर मार्गे पुणे नाशिक सेमी हाय-स्पीड ब्रॉड-गेज डबल लाईनचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) डीपीआर महारेलच्या DPR च्या आधारे सुधारित केला असून दिनांक १८/१२/२०२३ रोजी रेल्वे बोर्डाला सादर केला आहे. मध्य रेल्वेने सुधारित केलेले संरेखन जीएमआरटी अँटेनाच्या सर्वात बाहेरील अँटेनापासून १२-१३ किमी अंतरावर आहे.

वरील संरेखन बदल देखील दिनांक ०५/०१/२०२४ रोजी डायरेक्टरी/जीएमआरटीला कळवण्यात आला आहे. त्यानुसार डीपीआर रेल्वे बोर्डाच्या विचाराधीन आहे.

रेल्वे हा विषय केंद्रीय सुचीमध्ये समाविष्ट आहे. तसेच, महाराष्ट्र राज्यात नवीन रेल्वे मार्ग विकसित करण्याची प्राथमिक जबाबदारी ही रेल्वे मंत्रालयाची आहे. शासनास सन्माननीय लोकसभा सदस्य तसेच, सन्माननीय विधानसभा सदस्य तसेच, नागरिकांकडून जी निवेदने प्राप्त झाली होती ती दिनांक २३/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई यांना हस्तांतरित करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतनाचा लाभ मिळाला नसल्याबाबत

**(३)** * **६८९७ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रमशाळेतील ५ ते ६ सहाय्यक शिक्षक, लिपिक व शिपाई तसेच इतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन योजनेचा लाभ मिळालेला नसल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय दिनांक ४ ऑक्टोबर, २०१२ व ८ नोव्हेंबर, २०१२ नुसार नवीन परिभाषित अंशदान योजनेची कार्यपध्दती दिलेली असून त्यांच्या डीसीपीएस खात्यामध्ये कर्मचारी हिस्सा जमा होतो व शासन हिस्सा जमा झालेला नसल्याने या मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन योजनेचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मयत कर्मचाऱ्यांच्या डीसीपीएस खात्यामध्ये तात्काळ शासन हिस्सा जमा करून त्याचा संपूर्ण हिशेब करून या पीडित कुटुंबांना कुटुंब निवृत्तीवेतन योजनेचा लाभ देऊन तसेच विजाभज आश्रमशाळेतील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांचे डीसीपीएसचे रूपांतरण एनपीएस मध्ये झालेले नसून ते रूपांतरण तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) डीसीपीएस धारकांच्या खात्यात शासन हिस्सा जमा करण्यासाठी दिनांक २८/१/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये लेखाशीर्ष घेण्यात आले असून त्यासाठी तरतुद करण्यात आली आहे. शासन हिस्सा तातडीने जमा करण्याबाबत शासनस्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत.

शासन निर्णय दिनांक २७/९/२०२४ अन्वये डिसीपीएस लागू असणाऱ्या कर्मचाऱ्यांना एनपीएस योजना लागू करण्यास मान्यता देण्यात आली असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## गडचांदूर (जि.चंद्रपूर) येथील माणिकगड सिमेंट कंपनी प्रदूषण नियंत्रण संयंत्राचा वापर करित नसल्याबाबत

**(४) * ६८२२ श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदूर (जि.चंद्रपूर) शहराला लागून असलेल्या माणिकगड सिमेंट कंपनीमध्ये 'प्रदूषण नियंत्रण संयंत्राचा' वापर करण्यात येत नसून, सदर कंपनी नियमांचे उल्लंघन करून रात्री बेसुमार धुळ सोडत असल्याबाबतची तक्रार नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीच्या डम्पिंग यार्डमधील सडलेल्या कचऱ्याची अति उग्र दुर्गंधी व विषारी वायुमुळे जवळपास ५ कि.मी. परिसरातील रहिवासी हैराण झाले असून सततची धुळ व दुर्गंधी यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर कंपनीच्या कचऱ्याच्या डम्पिंग यार्डची व्यवस्था शहरापासून दूर करण्याबाबत तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उक्त कंपनीवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार किरकोळ आजार तसेच, दमा, न्युमोनिया, त्वचेचे आजार, इ. आजारांवर वेळीच उपचार केले जातात. तसेच, सदर आजारासंदर्भात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून वेळोवेळी शिबिरे घेऊन आजारांना आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केले जातात.

(३)महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगास दिनांक १७/०९/२०२५रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच, माणिकगड सिमेंट कंपनीने दिनांक ०९/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये कंपनी परिसरामध्ये नागरी घनकचरा साठवणूक व इंधन म्हणून वापरणे बंद केले असल्याचे कळविले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## खोपोली (जि.रायगड) येथे तरूणाच्या हत्येप्रकरणी आरोपींवर कारवाई करण्याबाबत

**(५) * ७१२१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) येथे मंगेश काळोखे यांची राजकीय वैमन्यस्यातून निर्घृण हत्या केल्याची घटना दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी घडली असून सदर घटनेनंतर परिसरात तीव्र संतापाची लाट उसळून स्थानिक नागरिकांनी पोलीस स्टेशन येथे जाऊन आरोपींना अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर घटनेची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तसेच चौकशीच्या अनुषंगाने तरूणाची हत्या करून कायदा व सुव्यवस्था हातात घेणाऱ्या आरोपींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

खोपोली नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करीता दिनांक ०२/१२/२०२५ रोजी मतदान होवून दिनांक २१/१२/२०२५ रोजी मतमोजणी पार पडली होती. प्रभाग क्रमांक २ मधुन नगरसेवक पदाच्या निवडणूकीमध्ये मयत मंगेश काळोखे यांची पत्नी व त्यांच्या विरुध्द मुख्य आरोपी यांची पत्नी उमेदवार होत्या. सदर निवडणुकीमध्ये मुख्य आरोपी यांच्या पत्नी पराभूत झाल्या. त्यातुनच आरोपी यांनी मंगेश काळोखे यांची दिनांक २६/१२/२०२५ रोजी हत्या केली असल्याचे प्राथमिकरित्या निष्पन्न झाले आहे.

सदर घटनेबाबत खोपोली पोलीस ठाणे, जि.रायगड येथे भारतीय न्याय संहिता, सन २०२३ चे कलम १०३(१), ६१(२), १८९(१), १८९(४), १९०, १९१ (३), २३८(अ) सह शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४, २५ अन्वये दिनांक २६/१२/२०२५ रोजी गुन्हा रजि.नं.३६६/२०२५ दाखल करण्यात आला आहे. तसेच नमूद गुन्हयात एकूण १७ आरोपींना अटक करण्यात आली असून १ विधी संघर्षीत बालक यास ताब्यात घेवून बाल सुधारगृहात पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील हवेच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(६) * ६९६५ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.जगन्नाथ अभ्यंकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः मुंबई व ठाणेसह मुंबई महानगर प्रदेश, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर या शहरांसह व अन्य शहरांतील इमारत व रस्ते बांधकाम, मोठ्या प्रमाणावरील वाहनांची वर्दळ, औद्योगिक क्षेत्रातून वायूंचे उत्सर्जन तसेच अन्य प्रकल्पांमुळे माहे ऑक्टोबर-२०२५ ते डिसेंबर-२०२५ या कालावधीमध्ये

दिल्लीपेक्षाही मोठ्या प्रमाणात हवेची गुणवत्ता खालावल्याने वायू प्रदुषणात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे मा.मुंबई उच्च न्यायालयाने माहे डिसेंबर, २०२५ मध्ये राज्य शासनाच्या तसेच महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेने वायू प्रदूषण नियंत्रणासाठी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी २८ मुद्दयांचा समावेश असलेली सर्वकष मार्गदर्शक तत्वे जारी केली असून, मुंबईतील विविध भागांमध्ये शासकीय आणि खाजगी प्रकल्पांमध्ये वायू प्रदुषणाच्या नियमांचे संबंधित विकासकांकडून उल्लंघन होत असून प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या किती विकासकांवर आतापर्यंत कारवाई करण्यात आली आहे,

(३) असल्यास, हवेच्या गुणवत्तेच्या निकषानुसार ० ते ५० दरम्यानची हवा "चांगली" मानली जाते तसेच ३०० पेक्षा अधिक वायु गुणवत्ता निर्देशांक हा "अत्यंत धोकादायक" श्रेणीत येत असून नवी मुंबई येथील वायु गुणवत्ता निर्देशांक ४०७ व खारघर शहराचा वायु गुणवत्ता निर्देशांक ४२० या "अत्यंत धोकादायक" स्तरावर असून, उरणमध्ये वायु गुणवत्ता निर्देशांक २०२ या "खराब" स्तरावर पोहोचला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील महानगरांतील हवेच्या गुणवतेमध्ये सुधारणा करुन हवा प्रदूषण रोखण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत NCAP योजनेंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून त्याद्वारे उपाययोजना सुरु असताना देखील प्रदूषणात वाढ होत असल्याचे निदर्शनास येणे हे गंभीर असून राज्यातील सर्व महानगरांतील प्रदुषणाची स्थिती ही नियंत्रणाबाहेर गेली असून सदर वाढलेल्या वायु प्रदूषणामुळे नागरिकांमधील फुफ्फुसांच्या कर्करोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून त्यासोबत दमा, हृदयविकार, ब्रॉंकायटीस, श्वसनाचे त्रास, डोळयांची जळजळ, सर्दी, खोकला आदी आजारांचे प्रमाण देखील वाढले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करून नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहण्यासाठी व हरित क्षेत्रवाढ करण्याबाबत आणि वाढते प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणत्या प्रभावी उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत तसेच सदर प्रदुषणास कारणीभूत प्रकल्पांविरोधात कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

माहे ऑक्टोबर-२०२५ ते माहे डिसेंबर-२०२५ या कालावधीमध्ये वायु गुणवत्ता निर्देशांक 'मध्यम (AQI १०१-२००)' श्रेणीत नोंदविला गेला असून तो सर्वसाधारणपणे समाधानकारक ते मध्यम स्वरूपात आढळून आलेला आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानूसार नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना प्रारंभी लेखी सूचना (Intimation) दिल्यानंतर, कारणे दाखवा नोटीस आणि काम थांबवण्याची नोटीस देण्यात येत आहे.

दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५ ते दिनांक ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत १९८१ बांधकामांना कारणे दाखवा नोटीस तसेच १०४७ ठिकाणी 'काम थांबवण्याची नोटीस' देण्यात आली असून सदर कार्यवाही सातत्याने सुरू आहे.

(३) हे खरे नाही.

सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केंद्रातील मासिक अहवालानुसार हवा गुणवत्ता निर्देशांक प्रामुख्याने समाधानकारक (AQI ५१–१००) ते मध्यम (AQI १०१-२००) श्रेणीत नोंदविला गेला आहे.

(४) राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP) अंतर्गत राज्यातील १९ शहरांमधील महानगरपालिकांनी हवा प्रदूषणाला आळा घालण्याकरीता कृती आराखडा तयार केलेला असून सदर कृती आराखड्यास दिनांक १९/०४/२०२२ रोजी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने मंजूरी दिली असून सदरील कृती आराखड्यानुसार पीएम २.५ व पीएम १० हे घटक सन २०२४ पर्यंत २० % ते ३० % व सन २०२६ पर्यंत ४० % कमी करण्याबाबतचे उदिष्ट असून त्याची अमलबजावणी सदर महानगरपालिकांमार्फत सुरू आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका, आरोग्य विभाग यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार शहरांतील नागरिकांच्या आरोग्यास, विशेषत: लहान मुले, वृध्द व श्वसनविकारग्रस्त नागरिकांच्या आरोग्यावर कोणताही परिणाम झालेला नाही दिसून येत नाही.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानूसार नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना प्रारंभी लेखी सूचना (Intimation) दिल्यानंतर, कारणे दाखवा नोटीस आणि काम थांबवण्याची नोटीस देण्यात येत आहे.

वायु प्रदूषण नियंत्रण व प्रदूषणकारी घटकांचा अटकाव करण्यासाठी "मुंबई वायु शमन प्रभावी योजना-२०२३" ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. बांधकामावरील नियंत्रणासाठी "२८ मुद्यांची सर्वकष मार्गदर्शक तत्वे" निर्गमित करण्यात आली असून त्याची काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीकडून महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे वीज दरवाढीचा प्रस्ताव पाठविल्याबाबत

**(७) * ६७२९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महावितरण कंपनीने कृषी पंपाचा जादाचा बोगस वीज वापर दाखवून व महसूल तूट असल्याचे कारण पुढे करत पुन्हा वीजदर वाढीचा प्रस्ताव मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे पाठविला असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने १ एप्रिल आणि १ जुलै अशा दोन वेळा वीज दरवाढीचा प्रस्ताव मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून मंजूर करून घेतला असून, ही दरवाढ परवडत नसल्याने या दरवाढीस मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली असतानाही पुन्हा एकदा दरवाढीचा प्रस्ताव महावितरण कडून दाखल करण्यात येत असल्याने सर्वत्र नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात चार वर्षांपासून नवीन वीज कनेक्शन जोडले नसून, सौर ऊर्जेचे सुमारे दोन ते तीन लाख कनेक्शन दिलेले आहेत, कृषी पंपांना रात्री दहा तासाऐवजी आठ तास वीज पुरवठा केला जातो, तसेच महावितरण व इतर विद्युत कंपन्याकडून स्थिर आकार, वहनकर, वीज शुल्क, इंधन अधिभार व इतर कर लावून ज्यादा वीज दराची आकारणी केली जात असून ते इतर राज्यांच्या वीज दरापेक्षा जास्त आहे तरी देखील महावितरण कंपनी वीज दरवाढ करित असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सहकारी पाणीपुरवठा संस्थाना एक पट पाणी वापरण्यासाठी दुप्पट ते तिप्पट विजेचे देयक भरावे लागत असून, लघु कृषी पंप धारकांना स्थिर आकार कमी आहे तरी सहकारी पाणीपुरवठा संस्थांना उच्च दाब ग्राहकांचा ज्यादा स्थिर आकार देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पूर्वी दोन महिन्यातून एकदाच देयक देण्यात येऊन घरगुती वापरासाठी ३०० युनिट पर्यंत सवलतीच्या दरात वीजदर आकारले जात होते परंतु त्यात बदल करून आता प्रत्येक महिन्याला वीज देयक देण्यात येत असून घरगुती वापराच्या युनिटमध्ये बदल करून केवळ १०० युनिट पर्यंत सवलतीच्या दरात वीज देण्यात येते तसेच जर १०१ युनिट वीज वापरली तर त्यांना १०० युनिट मोफतचा लाभ देण्यात येत नसून अधिक वीज आकारणी दाखवून त्याप्रमाणे वीज देयके तयार होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, मागील चार वर्षांपासून नवीन कृषी पंपांना वीज कनेक्शन देण्यात येत नसल्याने राज्यभरातील वीज ग्राहकांनी नाराजी व्यक्त केली असून नवीन कृषी पंपाचे कनेक्शन देण्याबाबत, तसेच घरगुती ग्राहकांना आणि उद्योगांना इतर राज्यांपेक्षा कमी दरात वीज उपलब्ध करून देण्याबाबत तसेच वीज दरवाढ रद्द करुन प्रस्ताव मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही,

महावितरण कंपनीने दिनांक २८ मार्च, २०२५ रोजीच्या बहुवर्षीय वीजदर आदेशामधील त्रुटी व त्याचा महावितरण वर होणारा प्रतिकुल परिणाम मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निदर्शनास आणून दिला. मा.आयोगाने सदर त्रुटी ग्राह्य धरुन सुधारीत आदेश दिनांक २५ जून, २०२५ रोजी जारी केले.

मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने पुर्वीच्या याचिकेवर दिनांक २ ते ८ जानेवारी, २०२६ दरम्यान, मा.उच्च न्यायालयाच्या तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नैसर्गिक न्याय तत्वाच्या पालनासाठी महावितरण कंपनीच्या याचिकेवर सहा ई-जन सुनावण्यांमधून वेगवेगळया भागधारकांची बाजू ऐकून घेतली.

त्यानंतर, मा.आयोगाची बदललेली रचना विचारात घेता मा.आयोगाद्वारे या प्रकरणी नव्याने दिनांक ०३ ते १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत सहा ई-जन सुनावण्यांमधून वेगवेगळया भागधारकांची बाजू ऐकून घेतली.
(३) हे खरे नाही.

राज्यात मागील ४ वर्षात पारंपारीक पध्दतीने एकूण ४,४०,१६७ इतक्या कृषी पंपाना विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच, मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेद्वारे राज्यात ४ वर्षांपासून ७,०८,९५४ सौर पंप प्रस्थापित करण्यात आले आहेत.

सद्य:स्थितीत संपूर्ण राज्यात ज्या कृषी वाहिन्यांवर दिवसा वीज पुरवठा करणे तांत्रिक दृष्टया शक्य आहे, अशा कृषी वाहिन्यांवर फक्त दिवसा थ्री फेज वीज पुरवठा करण्यात येत आहे. तसेच दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तांत्रिकदृष्टया सक्षम नसलेल्या कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना मा.महाराष्ट्र वीज

नियामक आयोगाच्या निर्देशानुसार शेतीसाठी ८ तास थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.

विद्युत अधिनियम २००३ नुसार मा.आयोगाला राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर ठरविण्याचा अधिकार आहे. सर्व नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा.आयोगाद्वारे निर्णय देण्यात येतो. मा.आयोगाद्वारे वेळोवेळी जारी केलेल्या विनियमामधील तरतुदींनुसारच विद्युत कंपन्यांकडून स्थिर आकार, वहनकर, वीज शुल्क, इंधन अधिभार व इतर करांची आकारणी करण्यात येते. त्यानुसारच महावितरणकडून वीजदर आकारणी करण्यात येते.

महाराष्ट्रातील वीजदरांची इतर राज्यातील वीजदरांशी तुलना करतांना इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील ग्राहक वर्गवारीची भिन्नता (मिश्रण) व ग्राहकांचा भार, औद्योगिक व कृषीग्राहक यांचे प्रमाण, वीज निर्मितीच्या स्त्रोतांची उपलब्धता, वीजेचे नेटवर्क (Network), तुलनेने मोठे भौगोलिक क्षेत्र तसेच ग्राहकांसाठी उपलब्ध सवलती इत्यादी विविध बाबींचा विचार करता, महाराष्ट्रातील वीजदराची इतर राज्याशी तुलना करणे संयुक्तिक होणार नाही.

(४) हे खरे नाही.

उपसा सिंचन योजनेला (Lift Irrigation Scheme) त्यांच्या मंजूर भाराप्रमाणे मा.आयोगाच्या आदेशानुसार उच्चदाब उपसा सिंचन योजनेला (HT Lift Irrigation Scheme) ला उच्चदाब कृषी या श्रेणीमध्ये वर्गीकृत करण्यात आले आहे. सहकारी पाणीपुरवठा संस्थाना उपसा जलसिंचन योजनेमार्फत वीज देयकात सवलत मिळत आहे. उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना मिळणाऱ्या एकत्रित सरासरी सवलतीचा विचार करता उच्चदाब ग्राहकांना तुलनेने अधिक सवलत मिळत आहे.

(५) हे खरे नाही.

मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या वेळोवेळी दिलेल्या वीज दर आदेशानुसार वीजदर आकारणी करण्यात येते. साधारणत: सन २००४ पासून टप्प्याटप्प्याने मासिक देयके देण्याची सुरुवात करण्यात आली. मा.आयोगाद्वारे ठरवण्यात आलेले वीजदर आदेशानुसारच १०१ युनिटच्यावर वीज वापरल्यास पहिल्या १०० युनिट पर्यंत त्या स्लॅब चे वीजदर लागू होतात व पुढील वापरासाठी १०१ ते ३०० युनिट स्लॅब चे वीजदर लागू होतात. दारिद्रय रेषेखालील (BPL) ग्राहकास दरमहा ३० युनिट पर्यंत वापरासाठी दर सवलत देण्यात आली आहे. मा.आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे चालू वापराकरीता घरगुती वापरासाठी दर निश्चिती करण्यात आली आहे.

(६) हे खरे नाही.

राज्यात मागील ४ वर्षात पारंपारीक पध्दतीने एकूण ४,४०,१६७ इतक्या कृषी पंपाना विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेद्वारे राज्यात ४ वर्षांपासून ७,०८,९५४ सौर पंप प्रस्थापित करण्यात आले आहेत.

मा.आयोगाद्वारे बहुवर्षीय वीजदर आदेशाद्वारे घरगुती वर्गवारीतील १-१०० युनिट्स व १०१-३०० युनिट्स वापर करणाऱ्या ग्राहकांच्या सरासरी वीजदरात आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत घट मंजूर केली आहे. त्याचप्रमाणे स्मार्ट मीटरचा पर्याय निवडणाऱ्या घरगुती वर्गवारीतील ग्राहकांकरीता आर्थिक वर्ष २०२५ -२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत सौर तासांदरम्यान वीज वापरासाठीच्या दरात ८० पैसे/युनिट ते रुपये १.००/युनिट पर्यंतची सवलत मा.आयोगाद्वारे मंजूर करण्यात आली आहे. तसेच, सद्य:स्थितीत महाराष्ट्रातील औद्योगिक ग्राहकांसाठी

मोठ्या प्रमाणात सवलती उपलब्ध आहेत. सदर सर्व सवलतीचा एकत्रित विचार केल्यास आणि ग्राहकाने वीज वापराचे सुनियोजन केल्यास घरगुती व औद्योगिक ग्राहकांचे सरासरी वीज देयक निश्चितच मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.

-----------------

## राज्यातील कालबाह्य व नादुरूस्त शिवशाही बसेस बंद करण्याबाबत

**(८) * ७५८४ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिवशाही बसेस बंद करण्याचा आदेश मा.परिवहन मंत्री यांनी दिला असून, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यामध्ये १० वर्षांपेक्षा जास्त जुन्या, कालबाह्य आणि तांत्रिकदृष्ट्या अयोग्य असलेल्या बसेस मोठ्या प्रमाणात असून सदर बसेस अद्यापही प्रवासी वाहतुकीसाठी वापरण्यात येत असल्याने प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या शिवशाही बसेसमध्ये वारंवार तांत्रिक बिघाड होणे, ब्रेक निकामी होणे, इंजिन ओव्हरहिट होणे, टायर फुटणे, दरवाजांची यंत्रणा काम न करणे अशा गंभीर समस्या नोंदविल्या गेल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मोठ्या प्रमाणावर कालबाह्य आणि तांत्रिकदृष्ट्या नादुरुस्त असलेल्या बसेस बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२), (३) व (४) रा.प. महामंडळाच्या ताफ्यात ६८८ स्वमालकीची शिवशाही वाहने असून त्यापैकी माहे जानेवारी, २०२६ मध्ये सरासरी ४५३ इतकी शिवशाही वाहने चालनात आहेत. तसेच शिवशाही वाहने वारंवार मार्गस्थ बिघाड होत असल्याने व प्रवासी प्रतिसाद कमी असल्याने सदर वाहनांचे निमआराम व साध्या वाहनामध्ये रूपांतरण करण्याचा धोरणात्मक निर्णय रा. प. महामंडळाच्या संचालक मंडळाने घेतला असून, त्याबाबत कार्यवाही सुरू आहे. शिवशाही वाहनांचे आयुर्मान १० वर्षापेक्षा जास्त नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(९) * ६९०० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील विविध औद्योगिक कंपन्यांमधून निघत असलेल्या विषारी वायूंमुळे वडाळा, चेंबूर आणि आजूबाजूच्या परिसरात विषारी हवेचे ढग पसरत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरात राहणाऱ्या रहिवाशांना विषारी वायूमुळे अनेक दशकांपासून डोळे चुरचुरणे, त्वचेला खाज येणे, घशाचा संसर्ग होणे, श्वास घ्यायला त्रास होणे, तीव्र डोकेदुखी, रात्रीची झोप न लागणे तसेच अन्य आरोग्यविषयक समस्यांचा त्रास सहन करावा लागत असून स्थानिकांनी याप्रकरणी ३००० तक्रारी राष्ट्रीय केमिकल ॲण्ड फर्टिलायझर्सच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने मुंबई येथील चेंबूर आणि आजूबाजूच्या परिसरातील प्रदूषण कमी करण्यासाठी कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत तसेच प्रदूषण करणाऱ्या औद्योगिक कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त आरोग्य अहवालानुसार मे. आरसीएफ लिमिटेड चेंबूर कंपनीमधून निघणाऱ्या विषारी वायूमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन विविध आजार होत असल्याची बाब वैद्यकीय आरोग्य अधिकारी, एम-पूर्व व एम-प, विभागाच्या निदर्शनास आलेली नाही.

तसेच, मे. आरसीएफ लिमिटेड चेंबूर उद्योगाकडून प्राप्त अहवालानुसार स्थानिकांकडून आरोग्याविषयक त्रास झाल्याबाबत ३००० तक्रारी मे. आरसीएफ लि. यांना प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच आरसीएफ ट्राम्बे हॉस्पिटल येथे आरसीएफ ट्राम्बे युनिट्समधून होणाऱ्या वायु उत्सर्जनामुळे आरोग्य विषयक कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) चेंबूर येथील उद्योगांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या संमतीपत्रातील अटीनुसार प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसवलेली आहेत. तसेच, प्रतिबंधनात्मक उपाययोजना केलेल्या आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहूल येथील संबंधित सर्व उद्योगांस,उत्सर्जन दृष्टीकोनातून प्रक्रिया अभ्यास,एकूण VOC उत्सर्जन इन्वेटरी, १० किमी परिसरातील प्रभाव मूल्यांकन, इ. बाबींच्या मोजमापकचा अभ्यास करण्याकरीता दिनांक १६/०९/२०२५ रोजी निर्देश देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी महामार्गावरील पोर्ला तसेच किटाळी येथे बसेस विलंबाने येत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याबाबत

**(१०)** * **७५७७ श्री.संदीप जोशी, श्री.प्रविण दरेकर, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी महामार्गावरील पोर्ला तसेच किटाळी येथे राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस नियमित वेळेत येत नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचण्यास विलंब होत असल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची बाब दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली-आरमोरी महामार्गावरील पोर्ला व किटाळी येथे महामंडळाच्या बसेस नियमित वेळेत येण्यासाठी व दोन्ही ठिकाणी थांबण्यासाठी पोर्ला तसेच किटाळी येथील विद्यार्थ्यांनी आंदोलन करून महामार्ग रोखला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील पोर्ला तसेच किटाळी येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस सदर ठिकाणी वेळेत येण्याकरीता तसेच उक्त महामार्गावरील बसेसच्या संख्या अथवा फेऱ्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) होय.
(३) व (४) गडचिरोली जिल्ह्यातील पोर्ला तसेच किटाळी येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सदर ठिकाणी राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस वेळेत पाठविण्यात येत आहेत. तसेच

सदर मार्गावर आरमोरी ते किटाळी व आरमोरी ते पोर्ला अशा २ नवीन फेऱ्या दिनांक २३/१२/२०२५ पासून सुरु करण्यात आलेल्या आहेत, सद्य:स्थितीत सदर, मार्गावरील विद्यार्थ्यांची कुठलीही तक्रार प्राप्त नाही.

-----------------

## पिंपरी (जि.पुणे) येथील सदनिकेमधून हायड्रोफोनिक गांजा छापा टाकून जप्त केल्याबाबत

**(११)** * **७०३८ श्री.योगेश टिळेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी (जि.पुणे) येथील एका सदनिकेमध्ये लागवड करण्यात आलेला हायड्रोफोनिक गांजा छापा टाकून जप्त केल्याची घटना माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी सखोल चौकशी करून हायड्रोफोनिक गांजाची लागवड करून अंमली पदार्थांचा साठा करणाऱ्यांवर तसेच तस्करी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच अंमली पदार्थाची तस्करी रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) दिनांक २६/११/२०२५ रोजी सिंबायोसिस कॉलेज हॉस्टेल जवळ रेंजहिल्स पुणे येथे सार्वजनिक रस्त्यावर एका व्यक्तीच्या ताब्यात रुपये १६००० किंमतीचा बियाबोंडा सारखा गांजाचा पाला हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशीररित्या विक्री करीता ताब्यात बाळगले असल्याचे मिळून आल्याने त्याच्या विरुध्द खडकी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३३६/२०२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट चे कलम २(अ), २(ब), २(क), ८(क), २०(अ), २०(ब), २०(२)(ब), २१(अ), २१(ब), २१(क), २२(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात आरोपीकडे मिळून आलेला अंमली पदार्थ हा त्याने एक्सर्बिया टाऊनशिप, हिंजवडी, पुणे येथे राहणाऱ्या दोन व्यक्तींकडून घेतल्याचे सांगितले व सदर दोन्ही व्यक्तींना पोलीसांनी अटक केली असून तपासात ते राहत्या घरात हायड्रोफोनिक गांजाची शेती करीत असल्याचे व त्याकरीता एका रूममध्ये प्लांट उभा केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर ठिकाणी पोलीसांनी कारवाई करुन

हायड्रोफोनिक गांजाचा प्लांट उध्वस्त करुन एकूण रुपये ४४,९७,७९९/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या पुढील तपासात एक्सर्बिया टाऊनशिप, हिंजवडी, पुणे येथे राहणाऱ्या दोन व्यक्तींकडून जप्त केलेला अंमली पदार्थ हा त्यांनी मुंबईतील घाटकोपर येथे राहणाऱ्या एका व्यक्तीकडून घेतल्याचे उघड झाल्याने सदर व्यक्तीस मुंबई येथील राहत्या घरातून अटक करण्यात आली असून एकूण रुपये २,८१,६९,५१२/- किंमतीचे अंमली पदार्थ व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. तसेच सदर व्यक्तीस अंमली पदार्थ पुरवणारा त्याचा साथीदारास गोवा येथून ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत सदर गुन्ह्यात एकूण ५ आरोपींना अटक करण्यात आले असून पाचही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत व गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी दिनांक ३१/०८/२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली असून ANTF चे सर्व युनिट्स कार्यान्वित करण्यात आले आहेत.

सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) मार्फत एकूण रुपये ५२३.१७ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत.

राज्यात सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुध्द १३९५४ गुन्हे दाखल असून १०६८६ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतूक करणे संदर्भात एकूण ३६५९ गुन्हे दाखल झालेले असून ५३०७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रुपये १३४०.४१ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

सन २०२५ मध्ये राज्यात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिम प्रभावीपणे व नियमीतपणे राबविण्यात आली आहे. तसेच सन २०२६ मध्ये एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अंतर्गत अंमली पदार्थाच्या व्यापारास, प्रसारास व वापरास आळा घालण्यासाठी राज्यभर प्रभावी मोहिम राबविण्याचा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांचा संकल्प आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील वाढते वायू प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१२) * ७५७४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) अलीकडील काळात १६८ इतका नोंदविला गेला असल्याची माहिती तसेच पार्टिक्युलेट मॅटर २.५, पार्टिक्युलेट मॅटर १०.५ नायट्रोजन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड व ओझोन या प्रदूषक घटकांची पातळी राष्ट्रीय मानकांपेक्षा जास्त आढळल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यांवरील धूळ, वाढती वाहतूक, औद्योगिक वायु उत्सर्जन, वृक्षतोड व हरित क्षेत्रातील घट यामुळे सोलापूर शहरातील वायुप्रदूषण वाढत असल्याबाबतचा अभ्यास अहवाल शासनाने तयार केला असून भविष्यात सोलापूर शहरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) १०० च्या आत आणण्यासाठी शासन कालबध्द व परिणामकारक योजना राबविणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धूळ नियंत्रण, रस्ते स्वच्छता, यांत्रिक झाडू (मेकॅनिकल स्वीपिंग), पाणी फवारणी, वृक्षलागवड, प्रदूषणकारी वाहनांवर नियंत्रण व औद्योगिक वायु उत्सर्जन तपासणी करून सोलापूर शहरातील वायुप्रदूषण नियंत्रणासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.

राष्ट्रीय स्वच्छ हवा(NCAP) या कार्यक्रमांतर्गत धुलीकणांचे प्रमाण, कालबध्द मर्यादेत कमी करण्यासाठीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. धुलीकणांचे प्रमाण कमी करण्याकरीता सोलापूर महानगरपालिकेचा शहर कृती आराखडा तयार करण्यात आला असून सदर आराखड्यास केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता मिळाली आहे.
(३) सोलापूर महानगरपालिकेकडून धुळीचे प्रमाण कमी करण्याकरीता दुभाजकांमधील वृक्षारोपण, पक्क्या रस्त्यांची निर्मिती, चौकामध्ये कारंजे उभा करणे, मियावाकी पध्दतीने वृक्षारोपण करणे, इ. उपाय योजना राबविण्यात येत आहेत. तसेच, धूळ नियंत्रणाकरीता, रस्ते स्वच्छतेकरीता दररोज मेकॅनिकल स्वीपिंग होत असून एकूण ७० किमी. चे रोड स्वच्छ केले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) येथील आदिवासी पाड्यांमध्ये विजेची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१३) * ७६९० श्री.संजय खोडके, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (जि.अमरावती) येथील रंगुबेली ग्रामपंचायतंर्गत येणाऱ्या रंगुबेली, कुंड, खोपमार, खामदा, ढोकडा व किन्हीखेडा या सहा गावांसह रक्षा, चोपन (ता.धारणी) व खुटिदा सुमिता, मारिता, सरोवरखेडा, रायपूर, बोराटया, माखला, माडीझुडप, चुनखडी, नवलगाव, बिच्छुखेडा (ता.चिखलदरा) या गावांमध्ये अद्यापही वीज नसल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेळघाटातील सदर गावपाड्यांतील आदिवासीं बांधवांच्या घरामध्ये विजेसारखी मूलभूत सुविधा न पोहोचल्याने शालेय विद्यार्थ्यांना रात्री अभ्यास करणे अडचणीचे ठरत असून, विजेवरील उपकरणांअभावी अत्यंत कष्टप्रद जीवन जगावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये शासकीय अधिकाऱ्यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०२५ रोजी धारणी व चिखलदरा तालुक्यास भेटी देऊन पाहणी केल्यानंतर देखील तेथील समस्या

सोडविण्याकरीता कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले असून, देशाच्या स्वातंत्र्याला ७९ वर्षे होऊनही दोन्ही तालुक्यांतील गावपाड्यांमध्ये विजेची सुविधा उपलब्ध करून न देण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी गांभीर्याने दखल घेऊन धारणी व चिखलदरा तालुक्यातील गावपाड्यांमध्ये वीज पुरवठा करण्यासाठी येत असलेल्या शासकीय, भौगोलिक व तांत्रिक अडचणी दूर करून वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) हे अंशतः खरे आहे.

सदर गावांमध्ये सध्या पारंपारिक पध्दतीने वीज पुरवठा उपलब्ध नाही. धारणी व चिखलदरा तालुक्यांतील सदर गावपाडे घनदाट जंगल, व्याघ्र प्रकल्प व संरक्षित वनपरिक्षेत्रात येत असल्याने Forest Conservation Act, १९८० व Wild Life Protection Act, १९७२ अंतर्गत आवश्यक वन परवानग्या घेणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने पारंपारिक वीज पुरवठा करण्याकरीता वन विभागाशी संबंधित विविध परवानग्यांच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे..

तसेच, सदर गावांपैकी चोपन व माखला (टेंभुर्नी ढाणा) या गावांमध्ये महाऊर्जामार्फत मायक्रोग्रीड प्रकल्प आस्थापित करण्यात आला आहे. NGO मार्फत कुंड, खामदा, किन्हीखेडा, खोपमार व रक्षा या ५ गावांमध्ये सौर मायक्रोग्रीड प्रकल्प उभारण्यात आले असून, सद्य:स्थितीत सदर प्रकल्पांकरीता महाऊर्जामार्फत दुरुस्ती व क्षमतावाढ प्रस्तावित आहे. तसेच, सदर गावांमध्ये केंद्र शासनाच्या सौभाग्य योजनेंतर्गत सन २०१८-१९ मध्ये ५ वर्षे देखभाल दुरुस्ती कालावधीसह महाऊर्जामार्फत वैयक्तिक सौर घरगुती दिवे प्रणाली आस्थापित करण्यात आलेली आहे.

(४) मेळघाट येथील सदर गावांमध्ये पारंपारिक पध्दतीने विजपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांच्या उभारणीकरीता निधीच्या मंजुरीसंदर्भात व वन परवानगीसंदर्भात कार्यवाही प्रगतीत आहे.

मौजे रायपूर, बोराट्याखेडा, माखला (टेंभुर्नी ढाणा वगळून) व बिच्छुखेडा येथे महाऊर्जामार्फत सौर मायक्रोग्रीड प्रकल्प आस्थापित व कार्यान्वित करण्याकरीता ई-निविदा प्रगतीपथावर आहे. उर्वरीत गावांमध्ये सौर मायक्रो ग्रीड प्रकल्प आस्थापित करण्याकरीता महाऊर्जाकडून ई-निविदा कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ओबीसींकरीता राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण योजनांमधील प्रशिक्षणार्थ्यांच्या जागांमध्ये कपात केल्याबाबत

**(१४) * ७१७९ अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.संजय खोडके, श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वडार, बारी, महाज्योती व आदिवासी संशोधन संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या ओबीसी प्रशिक्षण योजनांमधील प्रशिक्षणार्थ्यांच्या जागांमध्ये कपात करण्याचा निर्णय ओ. पी. गुहा समितीच्या शिफारशींनुसार घेण्यात आला असल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर येथील महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील (महाज्योती) विद्यार्थ्यांकरीता यूपीएससी, एमपीएससी प्रशिक्षणासाठीच्या जागा मोठ्या प्रमाणात वाढविण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर असूनही प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रशिक्षणार्थ्यांच्या जागांमध्ये कपात केल्यामुळे ओबीसी समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षांच्या संधींवर प्रतिकूल परिणाम झाला असून, ओबीसी समाजासाठी असलेल्या विविध प्रशिक्षण संस्थांमध्ये यूपीएससी, एमपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षणार्थ्यांची संख्या लक्षणीयरित्या कमी झाली असून समान धोरण राबविले जात नसल्यामुळे काही संस्थांमध्ये जागा मोठ्या प्रमाणावर कमी झाल्या असून काही ठिकाणी मर्यादित प्रशिक्षण दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व प्रशासकीय सेवांमधील प्रतिनिधित्व वाढविण्यासाठी तसेच प्रशिक्षणाच्या जागा पूर्ववत करण्याबाबत आणि भविष्यात अशी कपात करण्यात येऊ नये यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३०/१०/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील बार्टी, सारथी, टीआरटीआय, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या तसेच भविष्यात करण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या योजनांमध्ये एकसमानता असावी, यासाठी सर्वकष धोरण तयार करण्यात आले आहे. सदर सर्वंकष धोरणांत्तर्गत नमुद स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणातील युपीएससी व एमपीएससी या परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणाकरीता निवड करावयाची विद्यार्थी संख्या निश्चित करण्यात आलेली नाही.

तथापि, मा.मुख्य सचिव, महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजी आयोजित बैठकीतील निर्णयानुसार टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत सर्वकष धोरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी प्रत्येक संस्थेकरीता युपीएससी विद्यार्थी संख्या १०० इतकी तर एमपीएससी करीता ४०० इतकी मर्यादित करण्यात आलेली आहे.
(२), (३) व (४) महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग (UPSC) व महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता दिनांक २०/०१/२०२६ रोजी झालेल्या मा.संचालक मंडळाच्या बैठकीत UPSC करीता ४०० व MPSC करीता १००० वाढीव विद्यार्थी संख्येस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर प्रशिक्षणाकरीता वाढीव विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात

विद्यार्थ्यांची निवड यादी दिनांक २३/०१/२०२६ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून दिनांक ०२/०२/२०२६ रोजी पासून सदर प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव येथील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्यासाठी कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(१५)** * **७७१५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव येथील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्यासाठी पालकांकडून १ कोटी २६ लाख रूपये घेऊन त्यांची फसवणूक केली असल्याची घटना दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सदोष प्रवेश प्रक्रीयेसंदर्भात बाणेर (पुणे) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असूनही मुख्य आरोपींना अटक करण्यास पोलीस प्रशासनास अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर कारवाई करून शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेत होणारी आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे

सदर प्रकरणी, दिनांक १४/१२/२०२५ रोजी बाणेर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भारतीय न्याय संहितेचे कलम ३१६(२), ३१८(४) व ३(५) अन्वये गु.र.नं ३०१/२०२५ नोंदविण्यात आला आहे.

सदर आरोपीविरुध्द मुंबई शहर येथे गु.र.नं. ११/२०२५ व ६१/२०२४ प्रमाणे देखील गुन्हे दाखल आहेत. सदर प्रकरणी आरोपीने फिर्यादी आणि ०६ साक्षीदार यांची एकूण १,२६,२८,०२३/- रुपयांची फसवणुक केली आहे, त्यापैकी ६१,००,०२३/-रक्कम आरटीजीएस व्दारे बँक खात्यात व ६५,२८,०००/- इतकी रक्कम रोख स्वरुपात घेतली आहे.
(२) आरोपी यांनी फसवणुकीच्या उद्देशाने प्राप्त करुन घेतलेली रक्कम दोन खात्यावर जमा झालेली आहे. सदरच्या खात्याच्या केवायसीवरुन आरोपी यास निष्पन्न करण्यात आलेले आहे. नमुद खात्यांचा केवायसी धारक एकच इसम असून तो बिहार राज्यातील रहीवासी आहे. त्याचा शोध घेण्यासाठी दि-१२/०२/२०२६ रोजी बाणेर पोलीसांकडील एक पथक बिहार राज्यात स्थानिक पोलीसांसह त्यांच्या दिलेल्या पत्यावर गेले असता, सदर इसम हा त्या ठिकाणी मिळुन आलेला नाही.

सदरचे पथक हे आरोपी याचा शोध घेण्यासाठी अद्याप पर्यंत बिहार राज्यामध्ये स्थित आहे.
(३) राज्याच्या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचे प्रवेश हे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या द्वारे ऑनलाईन पध्दतीने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे पारदर्शकपणे पार पाडले जातात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ईश्वरपूर (ता.वाळवा,जि.सांगली) येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याबाबत

**(१६) * ७५९६ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरूण ईश्वरपूर (ता.वाळवा,जि.सांगली) येथे एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्यात आल्याची घटना घडली असून, माणुसकीला काळीमा फासणाऱ्या सदर घटनेमुळे पालकांमध्ये अत्यंत भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना कठोर शिक्षा होण्याकरीता तसेच सदर गुन्हा फास्ट ट्रॅक कोर्टवर चालविण्याबाबत ईश्वरपूर मधील संतप्त नागरिकांकडून सातत्याने होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाने ईश्वरपूर (ता.वाळवा, जि.सांगली) शहरातील सदर गंभीर घटनेची दखल घेऊन अशा घटना पुन्हा घडू नयेत याकरीता कोणत्या ठोस उपाययोजना केल्या आहेत तसेच शहरातील मुलींच्या छेडछाड व अत्याचाराच्या घटना तसेच अन्य गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस प्रशासनाची सक्षम यंत्रणा कार्यरत राहण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी ईश्वरपूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४८०/२०२५, दिनांक १७/१२/२०२५ रोजी कलम ६४(१), ७०, १३७(२), ११५(२), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ४, ५(ग), ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना दिनांक १७/१२/२०२५ रोजी अटक करण्यात येऊन दिनांक २२/१२/२०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती.

सद्य:स्थितीत दोन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीत असून दिनांक २९/०१/२०२६ रोजी दोन्ही आरोपींविरूध्द मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) ईश्वरपूर शहरातील महिला व मुलींबाबत छेडछाड व अत्याचाराच्या तसेच अन्य गुन्हेगारीच्या घटना घडू नयेत म्हणून करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे :-

(१) शहरामध्ये दिवसा व रात्री सक्त पेट्रोलींग करण्यात येत असून निर्जन स्थळी भेटी देऊन संशयितांची चौकशी करण्यात येते.

(२) शहरामध्ये पोलीस काका, पोलीस दिदी अभियानाअंतर्गत पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शाळा व कॉलेजला भेटी देऊन महिला व मुलींच्या सुरक्षेबाबत व कायद्याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. तसेच निर्भया पथकामार्फत शाळा, कॉलेजला भेटी दिल्या जातात व योग्य ते मार्गदर्शन करण्यात येते.

(३) पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एसटी बस स्टँड परिसरात दररोज पोलीस अंमलदाराची नेमणूक करण्यात आली आहे.

(४) पोलीस स्टेशन हद्दीत यात्रा, उत्सव दरम्यान महिला, मुलींची छेडछाड होऊ नये याकरीता बंदोबस्तासाठी महिला पोलीस अंमलदार तसेच पोलीस अंमलदार यांची नेमणुक करण्यात येते.

छेडछाडीचा प्रकार दिसुन आल्यास संबंधितांवर वेळीच कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वणी (जि.यवतमाळ) तालुक्यात वेस्टर्न कोलफील्ड लिमिटेडच्या (वेकोलि) खाणीत सुरक्षात्मक उपाययोजना करण्याबाबत

**(१७) * ६६५१ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेस्टर्न कोलफील्ड लिमिटेडच्या (वेकोलि)(ता.वणी, जि.यवतमाळ) खाणीत झालेल्या तीव्र स्फोटामुळे उडालेला दगड अंगावर पडून एका महिलेस गंभीर दुखापत झाल्याची घटना दिनांक २३ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटावेळी वेकोलिकडून आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना, संरक्षक भिंती, पूर्वसूचना यंत्रणा व स्थानिक नागरिकांचे स्थलांतरण याबाबत आवश्यक दक्षता न घेतल्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून वारंवार होणाऱ्या स्फोटांमुळे कोळसा वाहतुकीच्या मार्गावरील घरांचे नुकसान, नागरिकांचे जखमी होणे तसेच उपचारासाठी शासकीय आरोग्य यंत्रणेवर अतिरिक्त खर्चाचा भार येत आहे त्यामुळे अप्रत्यक्षपणे शासकीय निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोळसा वाहतुकीदरम्यान वाहतुकीचे वेळापत्रक व वाहतूक नियंत्रण यंत्रणा राबविण्यात न आल्याने तसेच पोलीस बंदोबस्ताचा अभाव व ग्रामस्थांच्या तक्रारींची दखल न घेतल्यामुळे परिसरात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वेकोलिच्या खाणीत स्फोट व कोळसा वाहतुकीदरम्यान झालेल्या अपघातांच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व भविष्यात अशा घटना टाळणे, नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत तसेच दुखापत झालेल्या महिलेला आर्थिक सहाय्य देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) वेकोलीच्या घोन्सा येथील कोळसा खाणीमध्ये दिनांक २३/१२/२०२५ रोजी दुपारी ४.४५ ते ४.४७ च्या दरम्यान स्फोट घेण्यात आले होते. तत्पूर्वीच खाणीच्या स्फोट परिक्षेत्रात असलेल्या शेतामध्ये दुपारी ३ ते ४ दरम्यान एक महिला जखमी झाल्याचे निदर्शनास आलेले होते. त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. महिला जखमी झाल्याबाबतची ची तक्रार दिनांक २४/१२/२०२५ स्थानिक पोलीस स्टेशनला दिलेली होती. सदरची तक्रार पुढील कार्यवाहीसाठी वेकोली प्रशासनाकडे ०२/०२/२०२६ रोजी पाठविण्यात आली आहे. सदर घटना खाणीतील स्फोटामुळे झालेली नसल्याचे जिल्हा प्रशासन व वेकोलीच्या यांच्या अहवालावरुन दिसून येते.

(२), (३) व (४) कोळसा खाणीमध्ये स्फोट करताना, आयआयटी (बीएचयु) वाराणसी यांच्या वैज्ञानिक अभ्यास अहवालातील शिफारशी तसेच खाण सुरक्षा निदेशालय, यांचेकडील मार्गदर्शक सूचनानुसार कंट्रोल ब्लास्टिक तंत्राचा वापर करुनच खनिजाचे उत्खनन केले जाते. कोल माईन्स रेग्युलेशन्स, २०१७ नुसार ब्लास्टींग क्षेत्राकरीता निर्धारित ५०० मीटर धोकादायक क्षेत्रात, प्रत्यक्ष स्फोटावेळी सुरक्षात्मक उपाययोजना, पूर्वसूचना यंत्रणा कार्यान्वित करणे, आवश्यक असल्यास नागरिकांचे स्थलांतर करणे, मोठ्या

लाऊडस्पीकरवरुन वारंवार सूचना देणे, इ. उपाययोजना करुनच खनिज स्फोटाबाबत कार्यवाही केली जाते. कोळसा वाहतुकीदरम्यान रस्त्यावरील वाहतूकीचे नियंत्रण करण्याची उपाययोजना वेकोलीमार्फत केली जाते. याअनुषंगाने, नागरिकांकडून प्राप्त तक्रारींची तात्काळ दखल घेऊन, तक्रारीचे निराकरण वेकोलीमार्फत केले जाते. जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ यांच्या अहवालानुसार, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ग्रामीण भागात मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात येत असल्याने, खाणीतील स्फोटामुळे, नागरिक जखमी झाल्याचे दिसून आलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील "पीएम कुसुम" आणि "मुख्यमंत्री सौर कृषी पंप" योजनेंतर्गत शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याबाबत

**(१८) * ६७१६ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी यासाठी शासनाने "पीएम कुसुम" आणि "मुख्यमंत्री सौर कृषी पंप" सारख्या महत्वाकांक्षी योजना सुरु केल्या असून, सदर योजनेचे कंत्राट घेतलेल्या एजन्सी आणि स्थानिक ठेकेदारांकडून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेतील शासनाच्या नियमानूसार शेतकऱ्यांनी केवळ कोटेशनची रक्कम (पात्रतेनुसार १० टक्के किंवा ५ टक्के) महावितरणकडे भरल्यानंतर सर्व्हेक्षणापासून ते सौर पंपाचा खांब उभा करणे, पॅनेल बसविणे आणि पाण्याची चाचणी घेण्यापर्यंतची सर्व कामे संबंधित ठेकेदार कंपनीने करावयाची असतानाही यासाठी लागणारे साहित्य (सिमेंट, वाळू, खडी) आणि मजुरीचा खर्च शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत कामे करतांना शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या कंपन्या व ठेकेदार यांचेवर कारवाई करण्यासाठी भरारी पथक नेमण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत असून शेतकऱ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक रोखण्यासाठी तसेच सदर ठेकेदार कंपन्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी गंभीर दखल घेऊन चौकशी करुन शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या दोषी ठेकेदार कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. आजपर्यंत दोन तक्रारी माहे मार्च-२०२५ दरम्यान प्राप्त झालेल्या होत्या. त्यावर कार्यवाही करुन शहानिशा केल्यानंतर ग्राहकांच्या तक्रारीत तथ्य नसल्याचे निर्दशनास आले आहे.

(३) सौर पंप धारक शेतकऱ्यांना तक्रार नोंदवण्यासाठी सीआरएम पोर्टल तयार केले असून त्यानुसार तक्रारींचे निरसन वेळेत केले जाते.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नवीन बसेस करीता चालक भरती करण्याबाबत

**(१९) * ६६६७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास ८००० नवीन बसेस घेणासाठी नुकतीच मान्यता प्राप्त झाल्या असून सदर निर्णय परिवहन महामंडळास सक्षम करण्यासाठी व प्रवाशांच्या दृष्टीने अत्यंत दिलासा देणारा आहे, परंतु सदर गाड्यांकरीता ३ वर्षासाठी कंत्राटी चालक नियुक्त करणार आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यानिनदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बसेस गाड्याचे आयुर्मान १५ वर्षे असणार असून चालक कंत्राटी पध्दतीने ३ वर्षांकरीता घेणार असल्याने गाडीची जबाबदारी, विश्वासार्हता, सुरक्षात्मक व सामाजिक प्रश्न निर्माण होणार असल्याने परिवहन महामंडळाने सदर गाड्यांसाठी कायमस्वरुपी चालकांची भरती करण्यात यावी अशी मागणी बेरोजगार असलेल्या चालक उमेदवारांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परिवहन महामंडळामार्फत कायमस्वरुपी चालक भरतीसाठी काय कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) नाही.
(३) व (४) रा.प.महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची दिनांक २५/०८/२०२१ रोजी मा.उपमुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीमध्ये सरळसेवा भरतीबाबत घातलेले निर्बंध उठवून चालनिय पदे सरळसेवेने भरण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## मावळ (जि.पुणे) तालुक्यात डान्सबार सुरू असल्याबाबत

**(२०) * ७३३३ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात डान्सबारला बंदी असतानाही पुणे आणि मुंबईच्या सीमेवर असलेल्या मावळ तालुक्यात विना परवाना लेडीज डान्स बार सुरू झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डान्सबारमुळे पुणे-मुंबई जुन्या महामार्गावर सर्वत्र गर्दी पाहायला मिळत असल्याने गुन्हेगारी वाढण्याची शक्यता असून, राज्यात डान्सबारला बंदी असतानाही विनापरवाना डान्सबार सुरु करण्यात आला असून नियम व अटींची अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही.

मावळ तालुक्यात डान्सबार नसून, परवानाधारक ऑर्केस्ट्राबार आहेत. मावळ तालुक्यातील ३ ऑर्केस्ट्राबार आस्थापनाधारकांनी परवान्यातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याने त्यांचेविरूध्द दिनांक १३/१२/२०२५ रोजी वडगाव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.क्र. ३३३/२०२५ व गु.र.क्र. ३३४/२०२५ अन्वये २ गुन्हे तर, कामशेत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.क्र. २४५/२०२५ अन्वये १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपरोक्त तीनही गुन्ह्यांचा तपास पूर्ण झाला असून, मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व बस स्थानकांवर महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याबाबत

**(२१) * ७१५७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.संजय केणेकर, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने महिला प्रवाशांची सुरक्षा, घातपातापासून दक्षता, सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मदत, घर सोडून आलेल्या महिलांना मदत, मनोरुग्णांना मदत यासाठी ४८ बस स्थानकांवर महिला सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याचा निर्णय घेतला असून सध्या मुंबई सेंट्रल, परळ, कुर्ला, स्वारगेट सारख्या मोठ्या ४८ बस स्थानकांवर प्रत्येकी २ महिला सुरक्षा रक्षक याप्रमाणे ९६ महिला सुरक्षा रक्षक नियुक्त केले असून उर्वरित सर्व स्थानकांवर आणखी महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणार असल्याची माहिती महामंडळाकडून दिल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत महिला सुरक्षा रक्षकांच्या नियुक्तीच्या कार्यवाहीमुळे ७०६ घटनांत सुरक्षा रक्षकांनी जबाबदारीने कामगिरी केली असून, त्यातील ३० प्रकरणांमध्ये गुन्हे नोंदविण्यात आल्याचे तसेच बस स्थानकांवरील छेडछाड, दागिने, पैसे चोरण्याच्या घडलेल्या घटनांची किती प्रकरणे सापडली व किती प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत,

(३) असल्यास, सर्व बसस्थानकांवर महिला सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्याकरीता आवश्यक संख्या किती आहे तसेच सदर महिला सुरक्षा रक्षकांची भरती प्रक्रिया राबवून नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) ज्या जिल्हास्तरीय बसस्थानकांवर महिला सुरक्षा रक्षक नेमणूकीस नाहीत अथवा कमी आहे तेथे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ/ मेस्को संस्था हे मागणी करूनही महिला सुरक्षा रक्षक पुरवू शकले नाही, अशा ठिकाणी पाठपुरावा करण्यात येत आहे.
(२) माहे जानेवारी ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत एकूण ७०६ घटनेमध्ये सुरक्षा रक्षकांनी आपली कामगिरी चोखपणे बजावलेली असून, एकूण ३० प्रकरणांमध्ये संबंधीतांवर गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. तसेच सदर कालावधीत बस स्थानकांवरील छेडछाड, दागिने, पैसे चोरणे, महिला व लहान मुले यांच्या सुरक्षेबाबतच्या घटनांची १८२ प्रकरणे सापडली असून, सदर घटनेतील संबंधित व्यक्तींना स्थानिक पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.
(३) व (४) सद्य:स्थितीत सर्व बसस्थानकांवर मिळून एकूण ३९४ महिला सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. परंतु सध्या भरती प्रक्रीयेवर निर्बंध असल्याने सुरक्षा रक्षक पदामध्ये सद्य:स्थितीत भरती प्रक्रिया प्रस्तावित नाही.

-----------------

## मुंबईतील लोकल रेल्वेतील महिला प्रवाशांच्या डब्यात घुसखोरी केलेल्या व्यक्तीने पनवेल ते खांदेश्वर स्थानकांदरम्यान तरूणीस ढकलून दिल्याबाबत

**(२२)** * **६६२० श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील लोकल रेल्वेतील महिलांच्या डब्यात चढलेल्या एका ५० वर्षीय व्यक्तीला महिलांनी हटकल्याने त्या व्यक्तीने १८ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीला पनवेल ते खांदेश्वर स्थानकांदरम्यान धावत्या लोकलमधून ढकलून दिल्याचा गंभीर प्रकार घडल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू घटनेमुळे मुंबईतील लोकल रेल्वेतील महिलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आरोपीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे तसेच मुंबईमध्ये लोकल रेल्वेतून दररोज प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांची लक्षणीय संख्या पाहता महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
सदर घटनेच्या अनुषंगाने, पनवेल रेल्वे पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे भारतीय न्याय संहितेचे कलम १०९(१) सह भारतीय रेल कायदा कलम १३८, १६२ अन्वये दिनांक १८/१२/२०२५ रोजी गु.र.नं २२३/२०२५ नोंदविण्यात आला आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी गुन्ह्यातील आरोपीस दिनांक १८/१२/२०२५ रोजी अटक केलेली असून सध्या तो तुरुगांत आहे.

तसेच, महिलांच्या सुरक्षेसाठी राबविण्यात येत असलेल्या प्रमुख उपाययोजना खालीलप्रमाणे :-

१. प्रत्येक रेल्वे स्थानकावर पोलीस अंमलदार, एमएसएफ व होमगार्ड यांची फलाट ड्यूटी नेमलेली आहे.

महिलांच्या डब्यांजवळ, फलाटावर व स्टेशन परिसरात आवश्यकतेनुसार पेट्रोलिंग व स्थिर बंदोबस्त ठेवण्यात येतो.

२. रात्री ०९.०० ते सकाळी ०६.०० वाजेपर्यंत महिलांच्या प्रत्येक डब्यात १००% गणवेशधारी सुरक्षा कर्मचारी उपस्थित ठेवण्यात येतात. गुन्हे शाखेअंतर्गत स्वतंत्र "निर्भया पथक" कार्यरत असून सदर पथकातील महिला पोलीस कर्मचारी साध्या कपड्यात महिला डब्यांत प्रवास करून गुन्हेगारांवर कारवाई करतात.

३. महिलांसाठी राखीव असलेल्या डब्यांमध्ये CCTV कॅमेरे व "Push to Talk" बटणे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

४. मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयातील प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र महिला सुरक्षा पथक व तसेच, प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला मदत कक्ष कार्यान्वित आहेत. तसेच, "बडी कॉप" संकल्पनेअंतर्गत महिला प्रवाशांशी थेट संवाद साधण्यासाठी व्हॉट्सअप ग्रुप तयार केले आहेत. यामध्ये सुमारे १८,००० पेक्षा अधिक महिला प्रवाशांचा समावेश आहे. तसेच, "खाकीतील सखी" अभियानाअंतर्गत महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेविषयी जनजागृती करण्यासाठी विविध महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या सहाय्याने विविध ठिकाणी पथनाट्य, रॅली, वैयक्तीक समुपदेशन यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले व हजारो प्रवाशांमध्ये जनजागृती करयात आली.

५. गर्दीच्या वेळी मेगाफोन/लाऊडस्पीकरद्वारे उद्घोषणा करून महिला सुरक्षेबाबत सूचना दिल्या जातात.

६. मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात महिलांविरुध्द घडणाऱ्या गुन्ह्यांस प्रतिबंध व्हावा याकरीता तसेच ज्या रेल्वे स्थानकावर महिला प्रवाशांवर जास्त प्रमाणात गुन्हे घडतात अशा व इतर ठिकाणी उपलब्ध मनुष्यबळातुन प्रत्येक रेल्वे स्थानकावर पोलीस अंमलदार/एमएसएफ, होमगार्ड महिलांसाठी राखीव असलेल्या डब्यासमोर नेमण्यात येतात, तसेच प्रत्येक रेल्वे स्टेशन हद्दीतील रॉबरी पॉईंट, ड्रॉपिंग पॉईंट तसेच हद्दीत पोलीस कर्मचारी नेमले जातात.

७. मुंबई व उपनगरातील रेल्वे स्थानकांवर गुन्हे रोखण्याकामी सुमारे ३९७ सीसीटिव्ही व ५९०४ कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.

८. रेल्वे पोलीस (GRP) Massive Flash Checking योजना राबवतात. यात दररोज पोलीस निरीक्षक ते पोलीस उप निरीक्षक दर्जाचे अधिकारी, ५०-६० पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने एका लोकलच्या प्रत्येक डब्यात जाऊन तपासणी करतात. अशा काही रेल्वे गाड्यांची तपासणी करुन झाल्यावर जवळच्या स्टेशनवर जाऊन तेथेही अशाच प्रकारे तपासणी केली जाते.

९. महिलांविरुध्द गुन्हे करणाऱ्या अटक आरोपींची माहिती व छायाचित्रांचे बुकलेट सर्व पोलीस ठाण्यांना वितरित करण्यात आले आहे.

१०. मुंबई लोहमार्ग पोलीसांची १५१२ ही हेल्पलाईन तसेच व्हॉटसअप नं. ९५९४८९९९९१, ८४२५०९९९९१ रेल्वे प्रवाशांकरीता कार्यन्वित करण्यात आलेले असून त्याकरीता पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई कार्यालय येथे अद्ययावत नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नैना क्षेत्रातल्या (नवी मुंबई) भूखंडाचे मोजमाप करुन देण्यासाठी लाच मागणाऱ्या सिडकोच्या दोन अधिकाऱ्यांना अटक केल्याबाबत

**(२३)** * **७५१० श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नैना क्षेत्रातील (नवी मुंबई) एका भूखंडाचे मोजमाप करून त्याचा अहवाल देण्यासाठी सिडकोच्या दोन अधिकाऱ्यांनी ९ लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांना अटक केल्याची बाब दिनांक १७ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्या पोलीस ठाण्यात कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच सदर अधिकाऱ्यांविरुध्द आतापर्यंत प्रशासकीय, विभागीय अथवा शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) संबंधित आरोपीतांविरुध्द सी.बी.डी. बेलापूर, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४८१/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७, १२ प्रमाणे दिनांक १७/१२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सुरु आहे.

तसेच आलोसे क्र.१, उप अधीक्षक भुमि अभिलेख (नैना प्रकल्प) सिडको, नवी मुंबई यांना जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक ३०/१२/२०२५ च्या आदेशान्वये आणि आलोसे क्र.२, निमतानदार भुमि अभिलेख, (नैना प्रकल्प) सिडको, नवी मुंबई यांना उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश मुंबई यांच्या कार्यालयाच्या दिनांक २२/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आर.ए. स्टुडिओमध्ये २० मुलांना ओलीस ठेवल्याबाबत

**(२४)** * **७०६४ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवई येथील आर.ए. स्टुडिओमध्ये वेब सिरीजच्या ऑडीशनसाठी आलेल्या सुमारे २० मुलांना ओलीस ठेवल्याप्रकरणी पोलीस तपास पूर्ण झाला असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात किती आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून कोणत्या कलमान्वये किती आरोपींना अटक करुन कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, शासनाने भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी मुंबई शहरात ऑडिशन कास्टिंग एजन्सी व स्टुडिओंवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच उक्त घटनेचा तपास तातडीने पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आरोपी याने दिनांक ३०/१०/२०२५ रोजी आर.ए. स्टुडीओ, महावीर क्लासीक सोसायटी, एल अॅन्ड टी गेट नं. ०६ च्या समोर, साकी विहार रोड, पवई, मुंबई येथे वेब सिरीजच्या ऑडीशनसाठी आलेल्या ०७ ते १४ वयोगटातील १७ मुलांना तसेच ०२ महिला व ०१ पुरुष याना पिस्टल, पेट्रोल, सोलूशन, लायटर बाळगून त्याना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने ओलीस ठेवले होते. ओलीस ठेवलेल्या मुलांची सुखरूप सुटका करण्यासाठी पवई पोलीस ठाणेकडून पोलीस पथक घटनास्थळावर गेले होते. त्यावेळी पोलीसांनी ओलीस ठेवलेल्या मुलांच्या सुरक्षेसाठी व स्वसंरक्षणाकरीता गोळीबार केला असता आरोपी जखमी झाला होता.त्यानंतर सदर जखमी इसम यास उपचाराकरीता ट्रॉमा हॉस्पिटल, जोगेश्वरी येथे दाखल केले असता उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यास मयत घोषित केले. त्यानुषंगाने घटनास्थळाचा इन्क्वेस्ट पंचनामा करुन पवई पोलीस ठाणे येथे दिनांक ३०/१०/२०२५ रोजी अपमृत्यू क्र. ९९/२०२५ ची नोंद बीएनएसएस मधील कलम १९४ अन्वये करण्यात आली. तसेच सदर प्रकरणी पवई पोलीस ठाणे यथे दिनांक ३१/१०/२०२५ रोजी गु.प्र.शा., गु.र.क्र. ११२९/२०२५. भा.न्या.सं. २०२३ मधील कलम १०९ (१), १४०, २८७, सह शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम ३, २५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सद्य:स्थितीत सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.
(२) सदर गुन्ह्यातील आरोपी इसम हा मयत असून सदर गुन्ह्याचा व अपमृत्यूचा तपास अद्याप सुरु असल्याने गुन्हा तपासाधीन आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) सदर घटनेच्या अनुषंगाने दाखल गुन्ह्याचा तपास कक्ष-८, गु.प्र.शा., गु. अ. वि. स्वतंत्ररित्या करत आहे.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, कलम ३९४ अंतर्गत अनुसूची ‘म’ मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे इमारतीच्या आतील भागामध्ये शूटींगसंबंधी कामकाज करण्यासाठी १२ महिन्यांकरीता संबंधित कागदपत्रांच्या पूर्ततेसापेक्ष अनुज्ञापत्रे दिली जातात. त्यांचे वार्षिक पातळीवर नुतनीकरण केले जाते.

महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी, सांस्कृतिक विकास महामंडळ तथा दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुबई येथे निर्मिती संस्थांना चित्रीकरण करण्यासाठी विहित पध्दतीने परवानगी दिली जाते.

चित्रनगरीतील बाह्य चित्रीकरण स्थळे व स्टुडिओ यामध्ये निर्मिती संस्थांनी आरक्षण केलेल्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी महामंडळाचे पर्यवेक्षक तसेच सुरक्षा विभागाकडून वेळोवेळी देखरेख करण्यात येते.

तसेच सुरु असलेल्या चित्रीकरण स्थळांवर महामंडळाच्या दक्षता पथकामार्फत देखिल नियमित पाहणी करण्यात येते. महामंडळाचा परिसर हा CCTV नियंत्रणाखाली आहे. त्याचप्रमाणे चित्रनगरीमध्ये आरे पोलीस स्टेशन, गोरेगाव उपनगर यांची विशेष बिट शाखा उपलब्ध आहे. अशा प्रकारे चित्रनगरी

परिसरात होणाऱ्या चित्रीकरणावर प्रशासनाचे नियंत्रण असते.

भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस विभागातील गुप्तचर यंत्रणा,सामाजिक सुरक्षा पथके यांचेमार्फत प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कारंजा घाडगे (जि.वर्धा) येथून कोटयवधी रूपयांचे मेफेड्रोन जप्त केल्याबाबत

**(२५) * ७३५० श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा घाडगे (जि.वर्धा) येथे महसूल गुप्तवार्ता संचालनालयाने (DRI) ऑपरेशन हिटरलँड ब्रू या कोडनेम खाली राबविलेल्या मोहिमेतील धडक कारवाईत १९२ कोटी रुपये किंमतीचा १२८ किलो मेफेड्रोन जप्त केल्याची बाब दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात अमंली पदार्थ आढळून आल्या प्रकरणी नार्कोटेक्स पोलीस नागपूर यांनी कारवाई केल्यावरही स्थानिक पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हे अनभिज्ञ होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून मुख्य गुन्हेगारावर कोणती कारवाई केली तसेच कारंजा घाडगे (जि.वर्धा) येथील उक्त कारवाईच्या अनुषंगाने स्थानिक पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकाची चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) दिनांक ०९/१२/२०२५ रोजी महसूल गुप्तचर संचालनालय (डीआरआय) यांनी “ऑपरेशन हिंटरलँड ब्रू” या सांकेतिक नावाच्या कारवाईत महाराष्ट्रातील वर्धा येथील एक गुप्त मेफेड्रोन उत्पादन युनिट उद्‌ध्वस्त केले आहे. सदर कारवाईत अंदाजे १९२ कोटी रुपये किंमतीचे १२८ किलो मेफेड्रोन, २४५ किलो प्रिकर्सर रसायने, कच्चा माल आणि संपूर्ण प्रक्रिया सेटअप जप्त करण्यात आला असून मुख्य सुत्रधारासह तीन व्यक्तींना एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये अटक करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर गुन्ह्यातील तीनही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

तसेच पोलीस अधीक्षक, वर्धा यांच्या दिनांक ११/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत प्रकरणी कारंजा घाडगे पोलीस स्टेशन मधील तत्कालीन पोलीस निरीक्षक यांची पोलीस नियंत्रण कक्ष वर्धा येथे बदली करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला विभागातील अकोला आगार क्रमांक १ व २ मधील वाहक व चालकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२६) * ६९८२ श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोल्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगार क्रमांक १ व २ मध्ये बिंदुनामावलीचे कामकाज गत ७-८ वर्षांपासून प्रलंबित असल्यामुळे आगाराकरीता मंजूर चालक व वाहकांची अनेक पदे रिक्त असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आगारामध्ये बसेसची संख्या मुबलक असली तरी चालक व वाहकांची पुरेशी उपलब्धता नसल्याने बस फेऱ्यांची संख्या घटली आहे तसेच बसेसमध्ये प्रवाशांची गर्दी वाढल्याने प्रवाशांना खाजगी वाहनांचादेखील आधार घ्यावा लागत असून प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अकोल्यातील आगार क्रमांक १ व २ च्या उत्पन्नातही मोठ्या प्रमाणात घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अकोल्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगार क्रमांक १ व २ मधील वाहक व चालकांची रिक्त पदे भरून बसेसच्या फेऱ्या वाढविण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२), (३)(४) व (५) राज्य परिवहन महामंडळाच्या अकोला आगार क्र. १ व २ मधील वाहक व चालक पदाची बिंदुनामावली दिनांक ३०/११/२०२५ रोजी अद्यावत करण्यात आली असून प्रमाणीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

अकोला आगार क्र.१ व २ मध्ये बसेसची संख्या नियतांच्या प्रमाणात असली तरी प्रवासी गैरसोय टाळण्याच्या हेतुने व प्रवाशांना अडचणीचा सामना न करण्याच्या दृष्टीने चालक व वाहकांची काही कामगार कर्तव्यांशी सांगड घालून आगारातील बसेस च्या फेऱ्या चालविण्यात येत आहेत. त्यामुळे ग्रामीण मार्गावरील फेऱ्या रद्द होत नाहीत.

तसेच अकोला आगार क्र.१ चे गतवर्षीच्या तुलनेत ५७.०२ लाखांने व आगार क्र.२ चे ४५.५० लाखाने वाढ झालेली आहे. दोन्ही आगारांमध्ये गतवर्षाच्या तुलनेत उत्पन्नातही वाढ झालेली आहे.

रा.प.महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची दिनांक २५/०८/२०२१ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत केलेल्या बैठकीमध्ये सरळसेवा भरतीबाबत घातलेले निर्बंध उठवून चालनीय पदे सरळसेवेने भरती करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## कासाडी नदी (जि.रायगड) प्रदूषण मुक्त करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२७)** * **७६०७ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने रायगड जिल्ह्यातील कासाडी नदी प्रदूषण मुक्त करण्याकरीता आयआयटी मुंबईने अहवाल सादर करूनही सदर अहवालाची अंमलबजावणी माहे डिसेंबर, २०२५ अखेर देखील करण्यात आली नसल्याचे निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हरित लवाद, नवी दिल्ली यांनी प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांना आकारलेल्या दंडाची जमा झालेली १५ कोटी रुपयांची रक्कम जिल्हाधिकारी यांनी पनवेल महानगरपालिकेकडे कासाडी नदीला प्रदूषण मुक्त करण्याकरता सुपूर्द करूनही पनवेल महानगरपालिका सदर निधीचा वापर करित नसल्याची तक्रार याचिकाकर्त्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कासाडी नदीलगत गावांतील तसेच काही सिडको वसाहतीमधील सांडपाणी प्रक्रिया न करता नदीत सोडण्यात येत असून यावर आय.आय.टी.च्या रिपोर्ट मध्येही आक्षेप घेतला असून यावर उपाय म्हणून एस. टी. पी. उभे करणे गरजेचे असताना त्याकरीता पनवेल महानगरपालिका अथवा पर्यावरण विभाग यांना निधी मिळूनही ते उभारण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून रायगड जिल्ह्यातील कासाडी नदी प्रदूषण मुक्त करण्याकरीता एस.टी.पी. उभारण्याबाबत पनवेल महानगरपालिका व पर्यावरण विभाग यांच्याकडून हेतूत: होणाऱ्या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, रायगड यांनी निर्देशित केल्यानुसार कासाडी "नदी पुनरुज्जीवन प्रकल्प- फेज १" अतंर्गत आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचेकडून अंमलबजावणी सुरु आहे.

(२) व (३) पनवेल महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (IIT. Bombay) यांच्या मार्फत "कासाडी नदी पाणी गुणवत्ता निरीक्षण अहवाल (सन २०१७-२०२१)" मध्ये सुचवलेल्या उपाययोजनांच्या आधारे " कासाडी नदी पुनरूज्जीवन प्रकल्प - Phase १" अंतर्गत कासाडी नदीचे जैविक व तंत्रज्ञान-आधारित उपाययोजनांद्वारे पुनरूज्जीवन करणे या कामाचा आराखडा, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन करणे याकरीता मे. यश इंजिनीरिंग कन्सलटंट्स प्रा. लि., नवी मुंबई यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सल्लागार में. यश इंजिनिअरींग कन्सलटेंट प्रा. लि. यांनी " कासाडी नदी पुनरूज्जीवन प्रकल्प Phase १" चे आराखडे, अंदाजपत्रक तयार केले असून तांत्रिक पडताळणीकरीता भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (IIT, Bombay) यांच्याकडे सादर करण्यात आले आहेत व सदर संस्थेच्या मार्गदर्शनाखाली कासाडी नदी संवर्धन अंमलबजावणीची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कासाडी नदी प्रदूषण मुक्त अनुषंगाने पहिल्या टप्प्यातील कामे जसे नदीतील अडथळे दूर करणे, कासाडी नदीपात्रातील घाण / कचरा / गाळ काढणे, गॅबियन बॉल बांधणे, बंधारा बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणेकरीता जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडून पनवेल महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आलेली रक्कम रुपये रुपये १७,४४,२२,१३४/- मधील अपेक्षित खर्च रक्कम रुपये ६,१५,७१,०००/- रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांच्याकडे वर्ग करण्यास दिनांक २०/११/२०२५ च्या सर्वसाधारण सभेने प्रशासकीय व आर्थिक मंजुरी दिलेली आहे. सदरची रक्कम पनवेल महानगरपालिकेमार्फत कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांचे नावे धनाकर्ष स्वरूपात वर्ग करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ लिंगायत समाजातील सर्व घटकांना मिळण्याबाबत

**(२८) * ७६११ श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लिंगायत समाजासाठी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची स्थापना शासनाने केलेली असून, सदर योजनेचा लाभ देतांना इतर मागासवर्गात असणेची अट नमूद करण्यात आलेली आहे तसेच लिंगायत समाजातील सर्वच घटक हे इतर मागास संवर्गात येत नसल्यामुळे केवळ २ ते ३% लोक या संवर्गात येत असल्याने संपूर्ण लिंगायत समाजास याचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाच्या स्थापनेचा उद्देश त्यामुळे साध्य होत नसून संपूर्ण लिंगायत समाजास याचा लाभ मिळणेसाठी इतर मागास संवर्गाचा असणेची अट वगळण्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,लिंगायत समाजातील केवळ २ ते ३% लोक इतर मागास संवर्गात येत असल्याने, त्यामुळे उर्वरित बहुसंख्य घटक सदर योजनेच्या लाभांपासून वंचित राहत असून संपूर्ण लिंगायत समाजाला लाभ मिळावा यासाठी इतर मागास वर्गाची अट वगळून सर्व घटकांना योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून केवळ इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील घटकांच्या आर्थिक व सामाजिक कल्याणाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार लिंगायत समाजातील मागास प्रवर्गातील घटकांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीच्या अनुषंगाने विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ या मुख्य कंपनीच्या अधिनस्त जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ या उपकंपनीची दिनांक ०९/०८/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापना करण्यात आली आहे. तथापि, लिंगायत समाजातील खुल्या प्रवर्गातील जातींना देखील योजनांचा लाभ मिळावा याकरीता विविध स्तरातून पाठपुरावा होत आहे. त्यानुसार लिंगायत समाजातील खुल्या तसेच मागास प्रवर्गाकरीता स्वतंत्र महामंडळ/कंपनी स्थापन करण्याबाबत नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून, सदरील अभिप्राय तपासून उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कराड (जि.सातारा) आगारातील बसेसमधील निकामी अग्निशमन यंत्रामुळे प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात आल्याबाबत

**(२९) * ७७६७ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) आगारात ८२ बसेस असून त्यातील काही बसेसमधील अग्निशमन यंत्रासारखी सुरक्षा उपकरणेही गायब असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपकरणे गायब असल्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात आली आहे, तसेच बहुतांश बसेसमधील अग्निशमन यंत्रे रिफील केली गेली नसून अग्निशमन यंत्रांबरोबर बसेस मधील प्रथमोपचार पेट्यादेखील गायब असल्याचे समोर आले असून अपघात किंवा आग लागल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कराड (जि.सातारा) आगारातील बसेसमधील सुरक्षा उपकरणांची नियमित तपासणी, देखभाल व उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी विशेष तपासणी मोहीम अथवा स्वतंत्र नियंत्रण यंत्रणा स्थापन करण्याबाबत, प्रवाशांच्या सुरक्षिततेसंदर्भातील नियमांचे पालन न करता बसेसला वाहतुकीकरीता परवानगी देणाऱ्या जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने सखोल चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) कराड आगाराच्या वाहन ताफ्यात एकूण ८५ इतकी वाहने समाविष्ट आहेत. कराड आगारात बसेसची आगार पातळीवर आगार व्यवस्थापक, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, वाहन परिक्षक यांनी तपासणी केली असता सर्व बसेसमध्ये अग्नीशमन उपकरणे आढळून आलेली असून, कोणत्याही बसमधील अग्नीशमन उपकरणे गायब झालेली नाहीत. सर्व बसेसमधील अग्नीशमन उपकरणे हे वापरण्यायोग्य व सुस्थितीत आहेत. अग्निशमन उपकरण सदोष असल्यास किंवा त्याची मुदत संपल्यास ते बदली करण्यात येते. तसेच आगाराच्या लांबपल्ला व मध्यम पल्ल्याच्या सर्व बसमध्ये प्रथमोपचार पेट्या उपलब्ध आहेत.

तसेच कराड आगाराच्या मागणीनुसार अग्नीशमन उपकरणे व प्रथोमोपचार पेट्या पुरवठा करण्यात येतात.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील मे.इंडोअमाइन्स प्रा.लि.कंपनीमुळे प्रदूषण होत असल्याबाबत

**(३०) * ७७५३ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली औद्योगिक क्षेत्र,टप्पा-१ मधील भूखंड क्र.ए-३९,४० येथील मे.इंडोअमाइन्स प्रा.लि.(पूर्वीची मे.सिग्मा सॉल्व्हेंट्स) या कंपनीने बांधकामात बदल करताना अग्निशमन विभागाच्या नियमांचे उल्लंघन केले असून कायमस्वरुपी अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले नसल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनी मधून होणाऱ्या वायू गळतीमुळे आणि रासायनिक सांडपाण्यामुळे हवा आणि पाणी यांचे प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन डोंबिवलीकरांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असून तसेच रेड कॅटेगरी मधील हे कारखाने दाट मानवी वस्तीजवळ कार्यरत असूनही त्यांच्या स्थलांतरणाबाबत शासनाने पूर्वी जाहीर केलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्यास संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरण विभागाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उक्त कारखान्यांवर निष्काळजीपणे मृत्यू घडविल्याबद्दल कठोर गुन्हे दाखल करुन कंपनीचा परवाना कायमस्वरुपी रद्द करुन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या पर्यावरण विभागातील अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांची त्रयस्थ समितीमार्फत उच्चस्तरीय चौकशी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

सदर कंपनीने दिनांक ११/०८/२०२३ रोजी महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतले आहे.

(२) आरोग्य अधिकारी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार कंपनी मधून होणाऱ्या वायू गळतीमुळे आणि रासायनिक सांडपाण्यामुळे हवा आणि पाणी यांचे प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाल्याबाबतची कोणतीही घटना अथवा तक्रार प्राप्त झालेली नाही व रूग्ण आढळून आलेले नाही.

लाल संवर्गातील उद्योग स्थलांतरीत करण्याबाबत महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाकडून क्षेत्रिय सर्वेक्षण समिती दिनांक ३१/०५/२०२४ रोजी गठित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांच्या दिनांक १३/०२/२०२२ रोजीच्या अहवालानुसार सदर कंपनी, कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत असून सदर कंपनीत मागिल पाच वर्षात कोणताही अपघात वा वायुगळतीची घटना घडल्याची नोंद नसल्याचे नमुद केलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संगमनेर (जि.अहिल्यानगर) शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत

**(३१)** * **६५८५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर (जि.अहिल्यानगर) शहराचा विस्तार, वाढती वाहन संख्या आणि व्यापाराचे स्वरूप लक्षात घेता, दिवसेंदिवस वर्दळ वाढत असताना वाहतूक नियंत्रणाची तीव्र गरज असून, तेथील पोलिसांची स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखा मनुष्यबळाअभावी बंद करण्यात आल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वतंत्र वाहतूक शाखा कार्यरत नसल्यामुळे शहरात बेशिस्त वाहतूक, अवैध पार्किंग आणि नियमांचे सर्रास उल्लंघन होत असून, यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे तसेच शासकीय नियमांची पायमल्ली होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहतूक पोलिसांच्या अभावामुळे बाजारपेठ, शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी होत असून, याचा व्यापारावर विपरीत परिणाम होत आहे व प्रशासकीय नियोजनाच्या अभावामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संगमनेर शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखा पुन्हा सुरू करण्याबाबत तसेच वाहतूक आराखडा तयार करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पोलीस प्रशासनाकडे वेळोवेळी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

संगमनेर येथील स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखा सन २०२१ पासून बंद करण्यात आली आहे.

तथापि, संगमनेर शहरातील महत्वाच्या चौकामध्ये नियमितपणे वाहतूक नियमन व नियंत्रण करण्याकरीता पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्यात येते. तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे रस्त्यावर अनियमित ठिकाणी पार्किंग केलेल्या वाहनांवर वेळोवेळी कारवाई केली जाते.
(३) हे खरे नाही.

संगमनेर शहरातील बाजारपेठेमध्ये अरुंद रस्ते असल्यामुळे वाहतूक कोंडी होत असते. सदरची तसेच शाळा महाविद्यालयाचे परिसरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी बीटमार्शल व पोलीस वाहनाद्वारे नियमित पोलीस गस्त घालून वाहतूक सुरळीत केली जाते. तसेच शहरातील महत्वाच्या चौकामध्ये नियमितपणे वाहतूक नियमन व नियंत्रण करण्याकरीता पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्यात येते. तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे रस्त्यावर अनियमित ठिकाणी पार्किंग केलेल्या वाहनांवर वेळोवेळी कारवाई केली जाते.
(४) संगमनेर शहर पोलीस स्टेशन अंतर्गत स्वतंत्र वाहतूक पथक तयार केले असून, सदर वाहतूक पथकामार्फत संबंधितांवर कायदेशीर कारवाई करुन,तसेच वाहतूक सुरळीत राहील याबाबत वेळोवेळी दक्षता घेतली जाते. सन २०२५ मध्ये वाहतुकीस अडथळा करणाऱ्या २८३ वाहनांवर भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये कारवाई करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(३२) * ६९०४ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३ जुलै,२००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार विजाभज (विमुक्त जाती भटक्या जमाती) आश्रमशाळेतील जे कर्मचारी आदिवासी नक्षलग्रस्त भागात कार्यरत आहेत व जे बदलीस पात्र नाहीत अशा कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी लागू केलेली असूनही यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कार्यरत विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी लागू करून वेतननिश्चिती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ४ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक १३ मार्च, २०२० रोजीचा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा एकस्तर वेतनश्रेणी रद्द करण्याबाबतचा शासन निर्णय

अधिक्रमित करण्यात आल्याचे तसेच महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघ यवतमाळचे अध्यक्ष यांनी दिनांक १ डिसेंबर, २०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे एकस्तर वेतनश्रेणीबाबत विभागाकडे स्पष्टीकरण मागितले असता इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या दिनांक २३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्राद्वारे एकस्तर वेतनश्रेणी लागू करण्याचे निर्देश असल्याबाबतचे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहाय्यक संचालक, यवतमाळ व इतर मागास व बहुजन कल्याण विभाग यांचेकडून यवतमाळ जिल्ह्यातील विजाभज आश्रमशाळेतील आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी लागू करण्यास विलंब करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने राज्यातील विशेषत: यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कार्यरत विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी लागू करून सुधारित वेतननिश्चितीचे लाभ अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विभशा २००६/प्र.क्र.२५४/ मावक-६, दिनांक ०३/१२/२००७ अन्वये नक्षलग्रस्त व आदिवासी क्षेत्रात येणाऱ्या तालुक्यातील व जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांमधील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता लागू करण्यात आला होता.

त्यानंतर शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्र.विभशा २०१९/ प्र.क्र.१०४२/विजाभज १, दिनांक ०४ जून, २०२५ नुसार नक्षलग्रस्त / आदिवासी क्षेत्रात स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित निवासी आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नतीचा लाभ अदा करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कार्यरत विजाभज आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर कार्यवाही करुन, सुधारित वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध कारागृहात असलेल्या कैद्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत

**(३३)** * **७३२२ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध कारागृहात असलेल्या कैद्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याकरीता उद्योग विभाग कार्यरत असून, अशा उद्योगातून अनेक वस्तू उत्पादित होत असतात परंतु सदरहू वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध होत नसल्याने अपेक्षित विक्रीतून महसूल मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या विविध विभागांनी आवश्यकतेनुसार कारागृह यांचेमार्फत उत्पादित होणाऱ्या वस्तू प्राधान्याने खरेदी करणेबाबत शासन निर्णय देखील निर्गमित केलेला असूनही सदर निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी बाबत विभागांची उदासिनता दिसून येणे तसेच कारागृह विभाग यांचे मार्फत उत्पादित वस्तू यांना बाजारपेठ उपलब्ध होऊन महसूल वाढ होणे, शासनाच्या विभागांनी प्राधान्याने कारागृह विभाग यांचे मार्फत आवश्यक वस्तूंची खरेदी करणेबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कैद्यांना अशा उद्योगांमार्फत प्रशिक्षण देखील उपलब्ध करून दिले जाणार असल्याने सदर कैद्यांना त्यांचा शिक्षा कालावधी संपुष्टात आल्यावर देखील याचा उपयोग होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासकीय कंपनी यांना कमी दरात मनुष्यबळ उपलब्ध होणे अशा हेतूने कारागृहाची सुरक्षितता लक्षात घेता उद्योग उभारणी करीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

कारागृहात बंद्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याकरीता उद्योग विभाग कार्यरत नाही. कारागृहातील शिक्षाधीन बंद्यांना कौशल्य विकासासाठी पूर्वीपासून कारागृहांमार्फतच विविध प्रकारचे उद्योग प्रशिक्षण दिले जाते. बंदी त्याच्या इच्छेनुसार उद्योगाची निवड करतात व त्यांच्या क्षमतेप्रमाणे विविध वस्तु तयार करतात. त्यामुळे सदर वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मात्र, बंद्यांनी निर्माण केलेल्या वस्तु विक्रीतून शासनास महसूलही उपलब्ध होतो.
मागील ३ वर्षात प्राप्त महसूलाचा तपशील:-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | प्राप्त महसूल (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| १ | २०२२-२३ | १२.६३ |
| २ | २०२३-२४ | ८.०२ |
| ३ | २०२४-२५ | १५.१४ |

(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या खरेदी नियमपुस्तिका नुसार, कारागृह निर्मित ६६ वस्तुंचे आरक्षण करण्यात आले आहे. त्यानुसार अंमलबजावणी होत असून, उदासिनतेचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

कारागृहातील उद्योग प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश बंद्यांना कौशल्य विकासातून प्रशिक्षण देणे असून, महसूल मिळविणे हा नाही. तथापि, कारागृह निर्मित वस्तु विक्रीतून शासनास महसूल प्राप्त होणे, हे त्याचे उप उत्पादन आहे.
(३) हे खरे आहे.

विविध अशासकीय संस्थामार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत बंद्यांना प्रशिक्षिण दिले जाते. सदर प्रशिक्षणामुळे बंद्याचा शिक्षा कालावधी संपुष्टात आल्यानंतर, त्याचा उपजिविकेसाठी उपयोग होतो.
(४) श्री श्री रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट, टाटा स्ट्राइव्ह, मे.मिंडा कॉर्पोरेशन लि., मे.हरिदास माधवदास सुगंधी, पुणे, भारत मिलिंग इंडस्ट्रीज, नाशिक इ. संस्थांमार्फत कारागृहातील बंद्यांना संगणक प्रशिक्षण,

डिजिटल मित्र, असिस्टंट इलेक्ट्रिशियन, फिल्ड टेक्निशियन, प्लंबर, सोलर पॅनल इन्स्टॉलेशन, होम अप्लायन्सेस, सुतारकाम, लोहारकाम, शिवणकाम व वाहन दुरुस्ती इ. प्रकारचे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जाते.

तसेच बंद्यांचा आहार, शिक्षण, कपडे, आरोग्य, वैद्यकीय खर्च व त्यांच्या सुरक्षेवर होणाऱ्या खर्चाची जबाबदारी शासनाची आहे.

त्यामुळे बंद्यांना स्वस्त दरातील मनुष्यबळ म्हणणे चुकीचे आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सौर ऊर्जा निर्मितीला गती देण्याबाबत

**(३४) * ६५९५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सौर ऊर्जा निर्मितीत ग्रीडमधील अडचणी, मागणीतील कमकुवत वाढ, रखडलेले करार आणि राज्यात ऊर्जेच्या मागणीची पूर्तता करता येत नसणे तसेच ऊर्जेची आवश्यकता असतानासुध्दा सौर ऊर्जा योजनेची निर्मिती मंदावली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सौर ऊर्जा निर्मिती करण्यास व त्यास गती देण्यासाठी प्रचार व प्रसार करण्यास शासन यंत्रणा कमी पडत आहे, तसेच सौर ऊर्जा निर्मितीमध्ये भ्रष्टाचार होत असून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असल्याने शेतकऱ्यांना नियमित वीज कनेक्शन देणे बंद केले असून सौर ऊर्जा पुरविण्यात येत नसल्याने शेतकऱ्यांचे अतोनात हाल होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत अभ्यास करुन राज्यात सौरऊर्जा निर्मितीला गती देणेबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेंतर्गत १५४०४ मे.वॅ. क्षमतेसाठीचे वीज खरेदी करार टप्प्या टप्प्याने करण्यात आलेले आहेत. सद्य:स्थितीत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना १.० व २.०, पी.एम. कुसुम घटक अ व क या सर्व योजना अंतर्गत राज्यामध्ये एकूण ३७२१.३ मे.वॅ. क्षमतेचे ७०२ सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झालेले असून, १०२११३१ कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठ्याचा लाभ होत आहे. उर्वरित ऊर्जा प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर प्रकल्प कार्यान्वित करण्याची मुदत माहे डिसेंबर, २०२६ पर्यंत आहे.

(२) सौर ऊर्जाच्या प्रकल्पांची नोंदणी, ग्रीड कनेक्टिव्हिटी व सौर प्रकल्प मुदतीत कार्यान्वित करण्यासाठी महाऊर्जा मार्फत सिंगल विंडो पोर्टल तयार करण्यात आले असून यशस्वीरित्या कार्यान्वित आहे.

शेतकऱ्यांना पारेषण विरहीत सौर पंप आस्थापित करण्यासाठी केंद्र शासनाने पी.एम. कुसुम घटक-ब योजना सुरू केली असून सदर योजनेंतर्गत ५,०८,२४५ सौर कृषी पंप आस्थापित केलेले आहेत. तसेच मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेंतर्गत २,०६,३९९ सौर कृषी पंप आस्थापित झालेले आहेत. त्यामुळे देशात सर्वात जास्त सौर कृषी पंप महाराष्ट्र राज्यात आस्थापित झालेले असून सदर योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य देशात अव्वल क्रमांकावर आहे.

(३) केंद्र शासन व राज्य शासन यांच्या पी.एम. कुसुम घटक अ, ब व क तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजना राज्यात राबविण्यात येत आहेत. या योजना जलद गतीने कार्यान्वित होण्यासाठी सौर प्रकल्प विकासकांना शासकीय जमिनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र शासनातर्फे ग्रामपंचायतीना प्रोत्साहनपर रुपये ५ लाख निधी प्रथम तीन वर्षांसाठी देण्यात येत आहे.

विकासकांना जलदगतीने प्रकल्प उभारणी करीता आवश्यक त्या सर्व परवानग्या सुलभतेने उपलब्ध होण्याकरीता सिंगल विंडो पोर्टल कार्यान्वित केले आहे. तसेच केंद्र शासनाच्या पी.एम.कुसुम घटक क योजनेतील प्रकल्प विकासक प्रति मे.वॅ. रुपये १.०५ कोटी इतके केंद्रीय वित्तीय सहाय्य (CFA) मिळणेसाठी पात्र आहेत.

(४) लागू नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्याबाबत

**(३५)** * **८२७२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज वितरणावरील वाढता आर्थिक ताण, पारंपरिक ऊर्जास्रोतांवरील अवलंबित्व कमी करणे, पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मितीस चालना देणे तसेच शासकीय कार्यालयांच्या वीज खर्चात बचत करण्याच्या उद्देशाने राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत सौरऊर्जेचा वापर सुरू करण्यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल तसेच कृषी क्षेत्रासाठी लागणारी वीज टप्प्याटप्प्याने शंभर टक्के सौरऊर्जेतून उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०३० पर्यंत राज्यातील एकूण वीज निर्मितीपैकी ५२ टक्के वीज अपारंपरिक ऊर्जास्रोतांमधून निर्माण करण्याचा शासनाचा संकल्प जाहीर करण्यात आलेला असताना, वरील घोषणांच्या अनुषंगाने शासकीय कार्यालये, कृषी पंप, शासकीय संस्था तसेच सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प उभारणीसंदर्भात शासनाने कोणती धोरणात्मक, प्रशासकीय व तांत्रिक पातळीवरील अंमलबजावणी सुरू केली आहे,

(३) असल्यास, सदर योजनांच्या अंमलबजावणीकरीता शासनाने आतापर्यंत किती निधी मंजूर अथवा वितरित केला आहे, राज्यातील किती शासकीय कार्यालयांमध्ये सौरऊर्जा प्रणाली बसविण्यात आली आहे किंवा बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे तसेच सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौरऊर्जेचा पूर्णत: अवलंब करण्यासाठी शासनाने टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्याबाबतची योजना आखली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रधानमंत्री कुसुम घटक ब योजना व AIIB बँकेकडून कर्ज घेऊन राबविण्यात येणाऱ्या घटक अ-मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनांअंर्तगत आतापर्यंत एकूण ७,२३,४१४ सौर कृषी पंप आस्थापित

करण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या पी.एम सुर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत राज्यातील शासकीय इमारतींचे सौरऊर्जेव्दारे विद्युतीकरण करण्यात येत आहे. महाऊर्जामार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यातील ३३,५३६ शासकीय इमारती रुफटॉप सौर ऊर्जा संयंत्र आस्थापित करण्यासाठी तांत्रिकदृष्टया सक्षम असल्याचे दिसून आले आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

प्रधानमंत्री कुसुम घटक ब योजना व AIIB बँकेकडून कर्ज घेऊन राबविण्यात येणाऱ्या घटक अ-मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनांअंर्तगत राज्य शासनाने आतापर्यंत एकूण रुपये ६४४३.०८ कोटी इतका निधी वितरीत केला आहे. पी.एम सुर्यघर मुफ्त बिजली योजना सुरु होण्यापुर्वी राज्यातील सुमारे ५१३८ शासकीय इमारतींचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करण्यात आले आहे. वित्तिय वर्ष २०२५-२०२६ मध्ये सर्व जिल्हा नियोजन व विकास निधीअंर्तगत अपारंपारिक ऊर्जेसाठी एकूण रुपये ३०९.४९ कोटी निधी मंजूर आहे. या निधीतून दिनांक १६/०२/२०२६ रोजी पर्यंत २,१९५ इमारतींकरीता प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून, त्यापैकी ४१० इमारतींवर प्रकल्प कार्यान्वित, १०११ इमारतींवर आस्थापना पूर्ण होऊन नेट-मिटरिंगची प्रक्रिया सुरू आहे, ७७४ इमारतींचे काम प्रगतीपथावर आहे. त्यानुसार एकूण ५५४८ शासकीय इमारतीचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करण्यात आले आहे. उर्वरीत तांत्रिकदृष्टया सक्षम शासकीय इमारतींचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(५) लागू नाही.

-----------------

## राज्यात बेकायदेशीररित्या ओला, उबर व रॅपिडो कंपन्या सेवा देत असल्याबाबत

**(३६)** * **६८९८ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ओला, उबेर व रॅपिडो कंपन्यांच्या बेकायदेशीर बाईक सेवांमुळे अपघात व महिलांच्या सुरक्षिततेबाबतच्या अनेक तक्रारी १६ पोलीस ठाण्यांमध्ये दाखल झाल्या असून, सदर कंपन्यांना देण्यात आलेले इलेक्ट्रिक दुचाकींचे प्रोव्हीजनल लायसन रद्द करण्याबाबत परिवहन विभागाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन प्राधिकरणाची बैठक दिनांक १८ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर कंपन्याविरुध्द कोणताही निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिलांच्या सुरक्षिततेबाबत तसेच बाईक टॅक्सी सेवांच्या अपघाताबाबत या कंपन्यांची सेवा बंद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) ओला, उबर व रॅपिडो कंपन्यांकडून बेकायदेशीर बाईक सेवांमुळे अपघात व महिलांच्या सुरक्षिततेबाबतच्या घटना निदर्शनास आल्या होत्या. त्याअनुषंगाने विभागाकडून संबंधित कंपन्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) राज्य परिवहन प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२५ रोजीच्या बैठकीमधील ठराव क्र. १९/२०२५ नुसार प्रथमत: परिवहन आयुक्त यांनी ॲग्रीगेटरधारक यांचे समवेत आढावा बैठक आयोजित करावी. तद्नंतर ॲग्रीगेटरधारकांचा प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला होता.त्यानुसार परिवहन आयुक्त यांनी ॲग्रीगेटरधारक यांचे समवेत दिनांक २९/१२/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये ॲग्रीगेटर प्रतिनिधींनी परिवहन आयुक्त यांना म्हणणे सादर केले आहे.
(३) अवैध दुचाकी प्रवासी वाहतूक करणाऱ्या चालकांवर विभागामार्फत नियमित दंडात्मक कारवाई तसेच ॲग्रीगेटरधारक यांना नोटीस जारी करण्यात आल्या असून काही प्रकरणात त्यांचे विरुध्द पोलीस स्थानकात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ (जि.जळगाव) शहरातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची लाखो रूपयांची सायबर फसवणूक झाल्याबाबत

**(३७)** * **७९७० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगाव) शहरात एका ८६ वर्षीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला 'टेरर फंडिंग'चा धाक दाखवत ८० लाख ५ हजार रुपयांची सायबर फसवणूक केल्याची घटना दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सायबर क्राईम अंतर्गत गुन्हा दाखल होऊनही फसवणूक करण्यात आलेली रक्कम कोणकोणत्या बँक खात्यांमध्ये व कोणत्या माध्यमातून (फोन कॉल, व्हॉट्सॲप, व्हिडीओ कॉल, ॲप इत्यादी) हस्तांतरित करण्यात आली आहे तसेच त्यापैकी रक्कम गोठविण्यात (फ्रीज) किंवा परत मिळविण्यात पोलीस प्रशासनास अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात वाढत चाललेल्या सायबर आर्थिक फसवणूक प्रकरणे रोखण्यासाठी जनजागृती, तात्काळ तक्रार नोंदणी, बँक समन्वय, सायबर तपास यंत्रणा बळकटीकरण तसेच गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

सदर घटनेबाबत सायबर पोलीस ठाणे जि.जळगाव येथे दिनांक ११/१२/२०२५ रोजी CCTNS No.४३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(ड) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) चौधरी बंधू भुवन, गरुड प्लॉट भुसावळ, जि.जळगाव येथे राहणाऱ्या एका ८६ वर्षीय सेवानिवृत्त तक्रारदार व्यक्तीस अज्ञात इसमांनी विविध व्हॉट्सॲप कॉलद्वारे पोलीस अधिकारी असल्याचे भासवले. सदर कॉल दरम्यान फिर्यादीस त्यांचा कुलाबा पोलीस स्टेशन, मुंबई येथे मनी लॉडरिंग व अतिरेक्यांकडून पैसे घेण्याबाबत दाखल गुन्ह्यात सहभाग असल्याचे सांगितले. अशा प्रकारे त्यांना धमाकावून त्यांच्याकडून RTGS द्वारे एकूण रुपये ८०,०५,४१६/- इतकी रक्कम वेगवेगळया बॅंक खात्यात ट्रान्सफर करण्यास भाग

पाडले. त्यामुळे त्यांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत उपरोक्त प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्ह्यात फसवणूक झालेली रक्कम वेगवेगळया बँक खात्यांमध्ये ऑनलाईन ट्रांन्सफर झाली असून सदर बेनिफिसीअरी बँक खातेधारकाची माहिती तसेच सदर बँक खात्याचे NEFT/IMPS Transaction चे I.P Logs बाबत माहिती मिळण्याबाबत संबंधित बॅकेस पत्रव्यवहार केला आहे. सदर गुन्ह्यात वापरलेल्या व्हॉट्सॲप क्रमांकाचे I.P. हे कंबोडिया या देशातील असल्याचे निष्पन्न झाले असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(३) राज्य शासनाने सायबर फसवणूकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधूनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे सायबर सुरक्षा प्रकल्पाचे मुख्यालय तसेच नोडल सायबर पोलीस स्टेशन कार्यरत असून त्याद्वारे राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्स/ पोलीस ठाणे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी कार्यरत आहे.

महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून २६ तज्ञ सल्लागारांच्या मदतीने राज्यातील १००० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना Forensic Tools चे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in ही वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० बाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या सोशल मिडीया Twitter, Instagram, Facebook, YouTube अकांउट्सद्वारे जनजागृती करण्यात आली आहे.

तसेच राज्यातील ३४ रेल्वे स्थानकांवरून महारेल एलईडी/ एलसीडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभाविपणे जनजागृती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड शहतील बसस्थानकात प्रवाशांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(३८) * ६७९१ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील सर्वात महत्वाचे सार्वजनिक वाहतूक केंद्र असलेल्या बसस्थानकात स्वच्छता व सुरक्षा व्यवस्था इ.मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने विद्यार्थी, महिला व जेष्ठ नागरीकांसह हजारो प्रवाशांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसस्थानक परिसरातील प्लॅटफॉर्म, प्रतिक्षालय, प्रवेशव्दारावर कचरा साचलेला असून, हिरकणी कक्षाचा वापर स्टोअर रुम म्हणून करण्यात येत असून, बसस्थानकातील स्वच्छतागृहाची अवस्था अत्यंत बिकट असून प्रवाशांच्या मदतीसाठीचा हेल्पलाईन नंबर देखील लागत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन नांदेड शहराच्या बसस्थानाकातील प्रवाशांच्या मूलभूत सोयी-सुविधांकडे दुर्लक्ष करणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे तसेच प्रवाशांना चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात

येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२), (३) व (४) नांदेड मध्यवर्ती बसस्थानक १० फलाटांचे आरसीसी सुस्थितीतील बसस्थानक आहे. बसस्थानकाचा परिसर पूर्ण काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. आरसीसी बैठक, शुध्द पिण्याचे पाणी, सुस्थितील प्रसाधनगृह, चौकशी कक्ष, स्थानक प्रमुख कार्यालय, पार्सल कक्ष, उपहारगृह, विद्यार्थी पासेस कक्ष, आरक्षण कक्ष, हिरकणी कक्ष इ. सुविधा आहेत. नांदेड मध्यवर्ती बसस्थानकावरून सद्या ७९१ फेऱ्यांचे आगमन व ७९१ फेऱ्यांचे निर्गमन होत असतात.

प्रसाधनगृह सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्विस ऑर्गनायझेशन या संस्थेमार्फत नियमित स्वच्छता राखण्यात येते. तसेच बसस्थानकावरील हिरकणी कक्षाचा वापर हिरकणी कक्षासाठीच केला जातो. नांदेड मध्यवर्ती बसस्थानकावरील हेल्पलाईन नंबर प्रवाशांच्या मदतीसाठीचा कार्यान्वित आहे. त्यामुळे प्रवाशांची कोणतीही गैरसोय होत नाही.

-----------------

## मुंबईतील वांद्रे ते दहिसर क्षेत्रात उद्योगांकरीता तसेच निवासी इमारतीसाठीचे ना-हरकत प्रमाणपत्र विलंबाने देण्यात येत असल्याबाबत

**(३९) * ७५१३ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे ते दहिसर या क्षेत्रात नव्याने उभारल्या जाणाऱ्या उद्योगांकरीता तसेच निवासी इमारतीसाठी आवश्यक असलेले ऊर्जा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मिळविण्यासाठी अर्जदारांना विद्युत विभागातील विद्युत निरीक्षक व त्यांच्या सहकाऱ्यांमार्फत लाखो रुपयांची मागणी केली जात असून, ना- हरकत प्रमाणपत्रासाठी जाणीवपूर्वक विलंब व अडचणी निर्माण करुन नाहक त्रास दिला जात असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी तक्रार करुनही विद्युत निरीक्षक यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांशी आर्थिक हितसंबध असल्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्यास जाणीवपूर्वक विलंब करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) माहे, जानेवारी-२०२५ मध्ये लोकप्रतिनिधीमार्फत मुख्य विद्युत निरीक्षक कार्यालयास याबाबत तक्रार प्राप्त झाली होती.
(२) व (३) सदर तक्रारीची अधीक्षक अभियंता, मुंबई यांच्यामार्फत चौकशी करण्यात आलेली असून त्यांचा प्राथमिक अहवाल दिनांक ३०/०६/२०२५ रोजी तसेच अंतिम अहवाल दिनांक १३/०२/२०२६ रोजी प्राप्त झाला आहे. सदर अहवालांनुसार विद्युत निरीक्षक, सांताक्रुझ या कार्यालयामार्फत नव्याने उभारल्या जाणाऱ्या उद्योगांकरीता तसेच निवासी इमारतीसाठी आवश्यक असलेले ऊर्जा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) विहीत कालमर्यादेत देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राचीन व ऐतिहासिक बारवांचे पुनरुज्जीवन व संवर्धन करण्याबाबत

**(४०) * ६६७५ श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संगमनेर (जि.अहिल्यानगर) येथे तसेच मराठवाड्यात होळकरकालीन ३०० बारव असून गंगापूर तालुक्यातील ११ बारवांसह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ७२ बारव आहेत असे सुमारे २० हजार ऐतिहासिक आणि प्राचीन बारव राज्यात असून त्यांना गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी माहे एप्रिल, २०२५ मध्ये २२ जणांची एक समिती स्थापन करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सुमारे ३०० वर्षांपुर्वी पिण्याचे पाणी सहज उपलब्ध व्हावे यासाठी ठिकठिकाणी दगडी बांधकाम केलेल्या पायऱ्यांच्या बारव (विहिर) बांधल्या असून काळाच्या ओघात आणि बदलत्या जिवन शैलीमुळे या ऐतिहासिक बारवांकडे दुर्लक्ष होऊन त्यांची पडझड झाली असून राज्यातील अनेक बारवांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात गाळ साचला असून त्यांना कचराकुंडीचे स्वरूप प्राप्त झाले आहे, परिणामी ऐतिहासिक वारशाचे नुकसान होऊन पुरातन वास्तू जतन करण्याच्या नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर २२ सदस्यीय समितीने आतापर्यंत किती बैठका घेतल्या आहेत, तसेच राज्यातील बारवांचा प्रत्यक्ष अभ्यास करून त्याबाबतचा अहवाल व शिफारशी शासनाला सादर केल्या आहेत काय,

(४) असल्यास, सदर प्राचीन बारवांच्या संवर्धनासाठी आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीच्या उपलब्धतेबाबत व नियोजनाबाबत विलंब होत असल्याने जलसंधारणाच्या उद्देशाकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून, सर्व ऐतिहासिक आणि प्राचीन बारव दुरुस्त करण्याबाबत तसेच बारवांच्या प्रत्यक्ष पुनरुज्जीवनासाठी व समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत संचालनालयाच्या अंतर्गत ०८ राज्य संरक्षित बारव आहेत. सदर बारवांचे जतन-संवर्धनविषयक कामकाज विभागाच्या निधी उपलब्धतेनुसार केले जाते.

(३), (४) व (५) आगामी काळात बारव संवर्धन समितीची बैठक घेऊन बारव संवर्धनाचे धोरण अंतिम करण्याचे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४१) * ६६०० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत वायू, नद्या, नाले आणि जलस्रोतांचे होणारे वाढते प्रदूषण रोखण्यास शासनास अपयश आले असून त्यामध्ये प्रकाश प्रदूषणाची भर झाली असून या सर्व प्रदूषणांचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील वाढत्या प्रदूषणाचा गांभीर्याने दखल न घेतल्यास मुंबईची अवस्था दिल्लीप्रमाणे होण्यास वेळ लागणार नसून शासनाने याबाबत उच्चस्तरीय चौकशी नियुक्त करून मुंबईतील विविध वाढत्या प्रदूषणाबाबत धोरण आखून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) वायु प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत "मुंबई वायु प्रदूषण शमन योजना २०२३" ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

•बांधकामादरम्यान होणाऱ्या वायु प्रदूषण नियंत्रणाकरीता "सर्वंकष मार्गदर्शक तत्वे" निर्गमित करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
•मुंबई शहर व परिसरातील हवा प्रदूषणाबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी स्वहीत याचिका क्र.३/२०२३ मध्ये पारीत केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने मुंबई महानगर परिसरातील हवा प्रदूषण नियंत्रणाकरीता उपाययोजना करण्याकरीता आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने दिनांक ०५/०२/२०२४ रोजी समन्वय समिती स्थापन केलेली आहे. सदर समितींच्या शिफारशींनुसार हवा प्रदूषणाला आळा घालण्याकरीता विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाण्यातील भिवंडी शहर परिसरात अवजड वाहनांची वाहतूक सुरु असल्याबाबत

**(४२) * ८०२६ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाण्यातील भिवंडी शहर परिसरात अवजड वाहनांना बंदी असल्याचे वाहतूक शाखेच्यावतीने प्रसिध्दी पत्रक काढले असतानाही स्थानिक वाहतूक शाखेचे पोलीसच लाच घेऊन अवजड वाहनांना प्रवेश देत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक वाहतूक शाखेचे पोलीसच लाच घेऊन अवजड वाहनांना प्रवेश देत असल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहतूक शाखेच्या प्रसिध्दी पत्रकानुसार अवजड वाहनांना बंदी आदेशाची कडक अंमलबजावणी करण्याबाबत व सदर प्रकरणी दोषी आढळलेल्या पोलिसांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये भिवंडीतील वाहतूक कोंडीला वाहतूक पोलीसांचे हप्तेखोर जबाबदार या शिर्षकाखाली सोशल मिडीयावर व्हिडीओ प्रसारित झाला होता.परंतु सदरचा व्हिडीओ

मोघम स्वरुपाचा असल्याने त्यामध्ये कोणतेही तथ्य आढळून आले नाही. तसेच याबाबत संबंधितानी त्याची काहीएक तक्रार नसल्याचे लेखी दिलेले आहे.

(३) पोलीस आयुक्तालय, ठाणे यांच्या दिनांक १०/०९/२०१८ व दिनांक ०१/१०/२०२५ रोजीच्या वाहतूक नियंत्रण अधिसूचना अन्वये गर्दीच्या वेळी मोठ्या अवजड वाहनांना बंदी घालण्यात आलेली आहे. तथापि, भिवंडी परिसरात साधारणत: ५५ हजाराच्या आसपास गोडाऊन असून त्या गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात अवजड वाहने येत असतात. या परिसरात पार्कींग लॉट्स उपलब्ध नसल्याने सदर वाहने मुख्य रोडवर आजूबाजुला उभी केली जातात. त्यामुळे सदर भागात आलेली अवजड वाहने ही प्रतिबंधित वेळेत सदर ठिकाणी थांबवून ठेवल्याने वाहनांची रांगा वाढून वाहतूक कोंडी होत असते.

अवजड मालवाहतूक करणारी काही वाहने परस्पर प्रतिबंधीत वेळेत बाहेर निघतात किंवा रोडवर वाहने उभी करुन वाहतुकीस अडथळा निर्माण करतात अशा वाहनांवर वाहतूक विभागाकडून माहे जानेवारी, २०२५ ते जानेवारी, २०२६ या कालावधीत भिवंडी नारपोली व कोनगांव वाहतूक विभागात मोटार वाहन कायदा कलम १७९ (१) अन्वये ५२,००८ केसेस करण्यात आलेल्या आहेत, तर मोटार वाहन कायदा कलम २२(२), १२२ अन्वये ३९,०३१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४३)** * **६७१२ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र बनावट दिव्यांग प्रमाणपत्र काढून विविध विभागांमध्ये नोकऱ्या, शैक्षणिक सवलती व इतर योजनांचा लाभ घेण्याचे प्रकार वाढले असल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर केल्याप्रकरणी १९७ संशयितांना आरोग्य विभागाकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले असून, आरोग्य विभागाकडून उक्त बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांची तपासणी करुन शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाव्दारे देण्यात आलेल्या सूचनांनुसार, दिव्यांग कल्याण विभागाच्या दिनांक २७ जुन, २०२४ च्या परिपत्रकांन्वये केंद्र / राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगासाठीच्या विविध योजना नोकरीमधील आरक्षण, पदोन्नती, सवलती इत्यादींचा लाभ मिळवण्यासाठी राज्यातील दिव्यांग व्यक्तींना वैश्विक ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे.

संशयास्पद दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय नोकरी मिळविणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्या दिव्यांगत्वाची पडताळणी करुन अवैध/बनावट दिव्यांग प्रमाणपत्र धारक अधिकारी कर्मचाऱ्यांवर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ९१ नुसार कार्यवाही करणेबाबत, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्राव्दारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व) यांना कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार एकूण २८ जिल्हा परिषदांचे अहवाल प्राप्त झाले असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.:-

| पडताळणी अहवाल प्राप्त झालेल्या जिल्हा परिषदांची संख्या | कार्यरत एकूण दिव्यांग अधिकारी / कर्मचारी | पडताळणी केलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांची संख्या | पडताळणी अंती प्रमाणपत्र नसलेले/ बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्र / ४० टक्के पेक्षा कमी दिव्यांगत्व आढळलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| २८ | १०,९२२ | ६२१८ | ३१६ |

तसेच, दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राव्दारे याबाबत सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविण्यात आलेले आहे. तथापि, त्याबाबतचा अहवाल अद्यापि, अप्राप्त आहे.

शासन निर्णय दिनांक ९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये दिव्यांगत्व प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्राची पडताळणी करणेबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पडताळणीअंती संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्र अवैध/ खोटे आढळल्यास अथवा पडताळणी अंती ज्यांचे दिव्यांगत्वाची टक्केवारी लाक्षणिक दिव्यांगत्वापेक्षा (४०%) कमी आढळल्यास त्यांचेवर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार कार्यवाही करावी. तसेच त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल ३ महिन्यांत या विभागास सादर करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

या विभागास बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्राबाबत (UDID) अद्याप ७९८ कर्मचाऱ्यांबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार संबंधित विभागांना तक्रारप्राप्त दिव्यांग कर्मचाऱ्यांचे दिव्यांगत्व तसेच दिव्यांगत्व प्रमाणपत्र पडताळणीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन सदर प्रकरणांची कार्यवाही विविध विभागांमार्फत सुरु असून कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अहवाल अपेक्षीत आहे.

(२) व (३) नाही.

शिक्षण विभाग जिल्हा परिषद, नांदेड मधील सार्वत्रिक बदली, २०२५ मध्ये शासन निर्णयातील तरतुदीनुसार बदली मध्ये संवर्ग-१ चा लाभ घेतलेल्या १९७ शिक्षकांच्या दिव्यांगत्वाबाबत साशंकता असल्यामुळे पडताळणी करण्यासाठी प्रस्ताव अधिष्ठाता जे.जे. समुह रुग्णालय, मुंबई व अधिष्ठाता अली यावर जंग नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ स्पीच ॲण्ड हिअरींग डिसेबिलीटीज बांद्रा, मुंबई यांना पाठविण्यात आला आहे. सदर पडताळणी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

प्रस्तुत प्रकरणी ७ शिक्षकांचे वैश्विक दिव्यांगत्व प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी यांचेकडून निर्गमित झाले नसल्याचे निदर्शनास आल्याने ६ शिक्षकांना निलंबीत करण्यात आले असून, विभागीय चौकशी

प्रस्तावित आहे. उर्वरीत १ शिक्षकाचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(४४)** * **७४५२ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये गेल्या वर्षभरात लक्षणीय वाढ झाली असून महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये महाराष्ट्र राज्य अग्रक्रमावर असल्याचे विविध अहवालाद्वारे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी प्रस्तावित 'शक्ती विधेयक' अद्याप मंजूर न झाल्यामुळे महिला अत्याचाराच्या प्रकरणांवर प्रभावी नियंत्रण आणण्यास अडचणी येत असून राज्यातील महिला व मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे 'शक्ती विधेयक' तातडीने मंजूर करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत महिलांकडून वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रतिबंध घालण्यासाठी, तक्रार नोंदणी, तपास व न्यायप्रक्रिया गतीमान करणे तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी "शक्ती विधेयक" मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे, खरे नाही.

NCRB ने प्रकाशित क्राईम इन इंडिया, २०२३ या अहवालानुसार महिलांसंबंधात दाखल गुन्ह्यांत महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात ९ व्या स्थानावर आहे. प्रकरणी सन २०२४ व २०२५ चा अहवाल प्रकाशित नसल्याने अग्रक्रमाबाबत तुलना करता येत नाही.
(२) व (३) शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० (वि.स.वि.क्र.५१) तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील तरतुदींचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ७२ व ७५(१) मध्ये सुधारणा सुचविलेल्या आहेत. त्यानुषंगाने, भारतीय न्याय संहिता व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ यामध्ये एकत्रितरित्या राज्य दुरुस्ती (State Amendment) करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.